cmyk

## संपादकीय

### स्वरसम्राज्ञी हरवल्या...

भारतीय संगीतसृष्टीतील एक सुवर्णयुग संपल्याची वेदनादायी जाणीव करून देणारी बातमी म्हणजे ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाची. वयाच्या ९२व्या वर्षी त्यांनी घेतलेला अखेरचा श्वास हा केवळ एका व्यक्तीचा अंत नाही, तर एका युगाचा अस्त आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीतविश्वात निर्माण झालेली पोकळी भरून निघणे अशक्यप्राय आहे.


दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२५ | सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### एसआयटीच्या रडारवर छत्रपती संभाजीनगर

छ. संभाजीनगरः राज्यभर गाजत असलेल्या शालार्थ आयडी घोटाळ्याचे लोण छत्रपती संभाजीनगरमध्येही पोहोचले आहे. खोट्या कागदपत्रांच्या आधारे दिलेल्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी, तुकडीला मान्यता नसतानाही संचमान्यता देत नव्याने शिक्षक भरती केल्याचे विविध कागदपत्रांवरून आढळले आहे. सन २०१२ ते २०२५ या दरम्यानच्या कालावधीतील वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी, विनाअनुदानितवरून अनुदानावर बदली, शिक्षकेतरहून शिक्षक पदावर पदोन्नती दिलेल्या संचिकांची तपासणी एसआयटी करत आहे. २०२१ पूर्वी नवीन विनाअनुदानित शाळा, नवीन तुकड्या असलेल्या संस्थाचालकांनी अनुदान मिळण्याची आशाच सोडून दिली होती. त्यामुळे बहुतांश संस्थाचालकांनी संचमान्यता करून घेतल्या नव्हत्या. मात्र, २०२१ मध्ये शासनाकडून अंशत: अनुदान मिळण्याची चाहूल लागताच मागील तीन ते पाच वर्षांमधील संचमान्यता 'अर्थ'पूर्ण व्यवहारांद्वारे एकदाच करवून घेतल्या.

### केळी उत्पादकांना हेक्टरी ७४ हजारांचा पीकविमा मंजूर

नांदेडः मुदखेड, बारड आणि अर्धापूर महसूल मंडळातील केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. गतवर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान सोसाव्या लागलेल्या शेतकऱ्यांना पीकविमा अखेर मंजूर झाला आहे. या मंडळांसाठी उच्च व निम्न तापमानाची भरपाई म्हणून एकूण हेक्टरी ७४ हजार ६७८ रुपये भरपाई जाहीर करण्यात आली आहे. गतवर्षी जून महिन्यात झालेली अतिवृष्टी आणि वादळी वार्यामुळे या तीनही मंडळातील सुमारे ४ हजार हेक्टरवरील केळी पिकाचे नुकसान झाले होते. त्याचप्रमाणे सलग पाच दिवस प्रतिकूल तापमानामुळेही शेतकर्यांचे मोठे नुकसान झाले होते. मात्र तापमानाची नोंद असूनही विमा कंपनीकडून तांत्रिक कारणास्तव शेतकर्यांचे दावे फेटाळले जात होते. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. दरम्यान, या शेतकऱ्यांनी भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांची भेट घेऊन या विषयाशी त्यांना अवगत केले. त्यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याशी चर्चा केली.

### तब्बल १६३ अल्पवयीन मुलांची सुटका

कटनीःबिहारमधून महाराष्ट्रातील लातूर येथे मजुरीसाठी आणण्यात येत असलेल्या १६३ अल्पवयीन मुलांची मध्य प्रदेशातील कटनी रेल्वे स्थानकावर रेल्वे पोलिसांनी सुटका केली आहे. ही कारवाई पाटणा–पूर्णा एक्स्प्रेसमध्ये करण्यात आली असून, या प्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आली आहे. बाल कल्याण समितीकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, रेल्वे सुरक्षा दल आणि शासकीय रेल्वे पोलीस यांनी शनिवारी रात्री कटनी स्थानकावर संयुक्त मोहीम राबवली. ही सर्व मुले ६ ते १३ वयोगटातील असून ती बिहारच्या अररिया भागातील रहिवासी आहेत. त्यांना स्लीपर कोचमधून अत्यंत दाटीवाटीने नेले जात होते. कटनी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वर ही कारवाई करण्यात आली. एकाच डब्यात तब्बल ५० हून अधिक मुले बसवण्यात आली होती. रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काही पालकांशी संपर्क साधला असता त्यांनी मुलांना शिक्षणासाठी पाठवल्याचे सांगितले. मात्र ही तस्करीची साखळी असल्याची दाट शक्यता असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२४.५० क्विंटल | २,०६३ | २,६५१ | २,२८६ |
| ज्वारी/हायब्रिड: १२९.५० क्विंटल | १,८०० | ३,८७१ | २,६८७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १९.५० क्विंटल | ७,२०० | ७,४०० | ७,३०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ५०.०० क्विंटल | २,३०० | २,६८६ | २,४८६ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ५,१०० | ५,२३० | ५,१५६ |

# खरीपात बोगस बियाणे विक्रेत्यांवर फौजदारी कारवाईचा इशारा

## शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी कृषी विभागाची मोठी मोहीम

**पुणे । प्रतिनिधी**

**खरीप हंगाम २०२६च्या पार्श्वभूमीवर बळीराजाची फसवणूक टाळण्यासाठी राज्यातील कृषी विभागाने कंबर कसली असून बोगस बियाणे, खतांचा काळाबाजार आणि अनधिकृत 'एचटीबीटी' कापूस बियाण्यांविरुद्ध व्यापक कारवाईचा इशारा दिला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**



राज्यात काही ठिकाणी शेतकऱ्यांची दिशाभूल करून निकृष्ट व बनावट बियाणे विक्री होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यामुळे उत्पादनावर परिणाम होऊन शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. ही बाब लक्षात घेऊन कृषी विभागाने यंदा अधिक आक्रमक भूमिका घेतली आहे. विशेषतः केंद्र आणि राज्य शासनाने प्रतिबंधित केलेल्या अनधिकृत 'एचटीबीटी' (तणनाशक सहनशील) कापूस बियाण्यांच्या छुप्या विक्रीवर प्रशासनाची करडी नजर आहे. केंद्र सरकारच्या 'जीईएसी' ची मान्यता नसलेली ही बियाणे पर्यावरणास घातक ठरत असून जमिनीची सुपीकता कमी करण्यास कारणीभूत ठरत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अशा बियाण्यांचा साठा आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत कठोर कारवाई केली जाणार आहे दरम्यान, सर्व कृषी निविष्ठा विक्री केंद्रे व गोदामांची १०० टक्के तपासणी करण्याची मोहीम युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहे. जिल्हानिहाय पथके तयार करून अचानक छापे टाकले जात असून बियाणे, खते आणि

पान २ वर

### विक्रेत्यांसाठी कृषी विभागाची लक्ष्मणरेषा

विक्री करत असलेल्या प्रत्येक कंपनीचे उगम प्रमाणपत्र परवान्याला जोडणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे. ज्या कंपन्यांचे बियाणे बोगस निघतील, त्यांच्याकडून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्याची जबाबदारी विक्रेत्यांची असेल. बियाणे नियंत्रण आदेशानुसार, विक्री केलेल्या वाणाचे गार्ड सॅम्पल एक वर्षापर्यंत जतन करणे अनिवार्य आहे. प्रत्येक विक्रीचे पक्के बिल देणे आणि दुकानाबाहेर साठा व किंमत फलक लावणे बंधनकारक केले आहे. कृषी केंद्रचालकांना खताच्या किमतीचे दरफलक अद्ययावत ठेवावे लागणार आहे.

# ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन

## वयाच्या ९२ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**मुंबई । प्रतिनिधी**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे रविवारी (१२ एप्रिल) मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. शनिवारी त्यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल केले होते. त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. तसेच छातीत संसर्ग झाल्याने आणि अधिक थकवा जाणवल्याने त्यांच्यावर आयसीयूत उपचार सुरु होते. पण उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने संपूर्ण देशभरात तसेच हिंदी, मराठी चित्रपटसृष्टी, गायन आणि कला क्षेत्रात शोककळा पसरली आहे.



आशा भोसले यांनी त्यांच्या ८० वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत चिरतरुण आवाजाने संपूर्ण देशातील तसेच जगभरातील चाहत्यांची मने जिंकली. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी ४ वाजता शिवाजी पार्क येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत.


आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगली येथे झाला. त्यांनी पहिलं गाणे १९४३ मध्ये माझा बाळ चित्रपटासाठी वयाच्या दहाव्या वर्षी गायलं होतं. पिया तू अब तो आजा, दम मारो दम, ये मेरा दिल, चुरा लिया है तुमने, आँखों की मस्ती के आणि दिल चीज क्या है यांसारखी सुपरहिट गाणी त्यांनी गायिली. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत १२ हजारांहून अधिक गाणी

पान २ वर

# अशोक खरात प्रकरण साधे नाही, येणाऱ्या काळात मोठे राजकीय वादळ येणार-राऊत

**मुंबई । प्रतिनिधी**

'भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण साधे नसून, मुख्यमंत्री कार्यालयाच्या माध्यमातून गोपनीय माहितीची गळती करण्यात आली आहे,'' असा आरोप करत खरात प्रकरणाकडे केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित म्हणून पाहता येणार नाही. सध्या खरात हा विषय मागे पडला असून, आता इतर अनेक महत्त्वाची माहिती समोर येणार आहे. येणाऱ्या काळात मोठे राजकीय वादळ येणार आहे, असा दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी रविवारी (दि.१२) माध्यमांशी बोलताना केला. यावेळी अशोक खरात प्रकरणी गृहखात्याच्या कार्यपद्धतीवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.



संजय राऊत म्हणाले की, ''सीडीआर (कॉल डिटेल रेकॉर्ड) ही अत्यंत संवेदनशील माहिती असते. ती मला सहज मिळणार नाही किंवा व्हॉट्सॲपवर पाठवली जाणार नाही. गृहमंत्री किंवा मुख्यमंत्र्यांच्या परवानगीशिवाय कोणालाही मिळू शकत नाही. मग ही माहिती कोणापर्यंत आणि कशी पोहोचली, हा मोठा प्रश्न आहे.'' ''ढोंगी बाबा खरातच्या पायाशी बसून फडणवीस यांच्या कार्यकाळातील

पान २ वर

# अमेरिकेत उभारला स्वामी विवेकानंदांचा पुर्णाकृती पुतळा

**दिल्ली । वृत्तसंस्था**

थोर भारतीय तत्वज्ञ आणि धार्मिक नेते असलेल्या स्वामी विवेकानंदांचा पुर्णाकृती पुतळा अमेरिकेत सिएटल येथे उभारण्यात आला आहे. अमेरिकेत उभारला गेलेला स्वामी विवेकानंदांचा हा पहिलाच पुर्णाकृती पुतळा आहे. सिएटलमधील अत्यंत व्यस्त वेस्टलेक चौकामध्ये हा पुर्णाकृती ब्रांझचा पुतळा उभारण्यात आला आहे. अमेरिकेतल्या एखाद्या शहराच्या प्रशासनाकडून अमेरिकेत कोठेही आतापर्यंत स्वामी विवेकानंदांचा पुतळा उबारण्यात आला नव्हता, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. सिएटलचे महापौर कॅटी विल्सन आणि सिएटलमधील भारतीय वाणिज्य दूतावासाचे महावाणिज्य दूत प्रकाश गुप्त यांनी संयुक्तपणे या पुतळ्याचे अनावरण शनिवारी केले.

पान २ वर

# न्याय मिळवण्यातील अडथळे हे मोठे आव्हान-सरन्यायाधीश सूर्यकांत

**दिल्ली । प्रतिनिधी**

देशाच्या कायदेशीर व्यवस्थेसमोर कायद्यांची कमतरता हे आव्हान नसून, सर्वसामान्य नागरिकांपर्यंत त्या कायद्यांची पोहोच नसणे हे सर्वात मोठे संकट आहे, असे मत सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी रविवारी व्यक्त केले.



उत्तराखंड उच्च न्यायालय आणि राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित न्याय अडथळ्यांच्या पलीकडे या दोन दिवसीय उत्तर विभागीय परिषदेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. केवळ कागदावर हक्क असून उपयोग नाही, तर ते हक्क लोकांच्या प्रत्यक्ष आयुष्यात उतरवणे गरजेचे आहे, अशी भावना त्यांनी यावेळी बोलून दाखवली. यावेळी सरन्यायाधीशांनी न्यायदानातील अंतर, विलंब आणि अंमलबजावणीतील त्रुटींवर बोट ठेवले. सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले,

पान २ वर

# स्कूल बसवाल्यांच्या मनमानीला चपराक !

## शालेय बसचे भाडे आता सरकार ठरवणार, पालकांना आर्थिक दिलासा मिळणार

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात स्कूल बसच्या भाडे नियंत्रणासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. यात नवीन नियमांनुसार शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाणार आहे. परिणामी, विद्यार्थ्यांकडून फक्त मासिक भाडेच आकारले जाईल. तर आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी



करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने शालेय बस व वाहतूक व्यवस्थेबाबत कडक आणि सर्वसमावेशक नियमावली जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. गृह विभागाने प्रसिद्ध केलेल्या मसुदा अधिसूचनेनुसार, 'महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम, २०२६'लागू करण्याचा प्रस्ताव असून, यात सुरक्षितता, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर देण्यात आला आहे. या बाबतीत अधिसूचना जाहीर झालेल्या दिनांकापासून पंधरा दिवस या विहित वेळेत संबंधित संकेतस्थळावर सर्वसामान्य जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून त्याला

पान २ वर

# इराण-अमेरिका शांतता चर्चा फिस्कटली

## २१ तासांच्या मॅरेथॉन चर्चेनंतरही कोणताही करार नाही-जेडी व्हान्स

**इस्लामाबाद । वृत्तसंस्था**

**गेल्या ४० दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षानंतर अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न तूर्तास अपयशी ठरले आहेत. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे तब्बल २१ तास चाललेल्या उच्चस्तरीय चर्चेनंतर कोणताही ठोस करार होऊ शकला नाही, अशी माहिती अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हान्स यांनी दिली आहे.**




मध्य-पूर्वेतील तणाव आणि 'होर्मुझची सामुद्रधुनी' उघडण्याच्या मुद्द्यावर मार्ग काढण्यासाठी दोन्ही देशांचे प्रतिनिधी आमनेसामने बसले होते. रविवारी पहाटे पत्रकार परिषदेत बोलताना जेडी व्हान्स म्हणाले की, ''आम्ही चर्चेसाठी आमचा 'अंतिम आणि सर्वोत्तम' प्रस्ताव दिला होता, परंतु इराणने अमेरिकेच्या अटी मान्य करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे आम्ही

पान २ वर

# बालीन शहानी केले ते नरेंद्र मोदींना जमेल का?

**बीड । प्रतिनिधी**

**नेपाळचे नवनिर्वाचित पंतप्रधान बालेंद्र शाह (बालीन शाह) यांनी गेल्या काही काळात घेतलेले निर्णय आणि त्यांची कार्यपद्धती सध्या जगभरात चर्चेचा विषय ठरत आहे. रॅपर ते पंतप्रधान असा त्यांचा प्रवास एखाद्या चित्रपटासारखा असला, तरी त्यांचे निर्णय अत्यंत व्यावहारिक आणि धाडसी आहेत. नेपाळ हा भौगोलिक दृष्ट्या छोटा देश आहे भारत हा भौगोलिक दृष्ट्या मोठा देश आहे त्यामुळे नेपाळमध्ये ही कार्यपद्धती योग्य ठरू शकते मात्र भारतामध्ये ही कार्यपद्धती अमलात आणण्यासाठी वेळ लागत असला तरी अगदी त्याच पद्धतीने निर्णय घेतले तर चांगले ठरतील, अशी सध्या तरी समाज माध्यमांमध्ये चर्चा सुरू आहे.**




बालीन शाह आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यशैलीची तुलना केली तर दोन देशांचे दोन लोकनायक. नेपाळमध्ये सध्या बालीन लाट आहे. ३५ वर्षांच्या या तरुण इंजिनीअरने नेपाळच्या राजकारणातील जुन्या प्रस्थापितांना धूळ चारली आणि सत्तेवर येताच अशा काही सुधारणा केल्या ज्याची कल्पनाही करणे कठीण होते. दुसरीकडे, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गेल्या दशकापासून जगातील सर्वात लोकप्रिय नेत्यांपैकी एक आहेत. या दोघांच्या कामात काही साम्य आहे, तर काही टोकाचे फरकही आहेत. बालीन शाह यांनी सत्तेवर येताच खासगी शाळांच्या मक्तेदारीला लगाम घालण्यासाठी



कडक पावले उचलली आहेत. नेपाळमधील १०० कलमी कार्यक्रमांतर्गत त्यांनी शाळांमधून



राजकीय पक्ष आणि विद्यार्थी संघटनांची कार्यालये हटवण्याचे आदेश दिले. तसेच, ५ वी पर्यंतच्या परीक्षा रद्द करून मुलांवरील ओझे कमी केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सरकारी अधिकाऱ्यांच्या मुलांनी सरकारी शाळेतच शिकले पाहिजे, असा संकेत त्यांनी दिला आहे, जेणेकरून सरकारी शाळांचा दर्जा सुधारेल. मोदी सरकारने भारतात नवीन शैक्षणिक धोरण (२०२०) आणले. मोदींचा भर सरकारी शाळा बंद करण्याऐवजी सरकारी शाळांचे आधुनिकीकरण करण्यावर आहे (उदा. पीएम श्री शाळा). भारतात खासगी आणि सरकारी दोन्ही व्यवस्थांना स्थान दिले आहे, पण बालीन शाह यांच्यासारखा

पान २ वर

cmyk

cmyk



## अग्रलेख

# स्वरसम्राज्ञी हरवल्या...

भारतीय संगीतसृष्टीतील एक सुवर्णयुग संपल्याची वेदनादायी जाणीव करून देणारी बातमी म्हणजे ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाची. वयाच्या ९२व्या वर्षी त्यांनी घेतलेला अखेरचा श्वास हा केवळ एका व्यक्तीचा अंत नाही, तर एका युगाचा अस्त आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीतविश्वात निर्माण झालेली पोकळी भरून निघणे अशक्यप्राय आहे.

आशा भोसले म्हणजे केवळ एक नाव नव्हे, तर भारतीय चित्रपटसंगीताच्या इतिहासातील एक अढळ पर्व. तब्बल आठ दशकांहून अधिक काळ त्यांनी आपल्या बहुआयामी आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. हिंदीसह मराठी, बंगाली, गुजराती, तमिळ, तेलुगू अशा अनेक भाषांमध्ये त्यांनी गायलेली हजारो गाणी आजही तितक्याच ताजेपणाने ऐकू येतात. त्यांच्या आवाजात असलेली लवचिकता, भावनांची खोली आणि प्रयोगशीलता यामुळे त्या इतरांपेक्षा वेगळ्या ठरल्या.

संगीत हीच त्यांची खरी शाळा होती. लहान वयातच शिक्षण सोडून कुटुंबाची जबाबदारी स्वीकारताना त्यांनी ज्या जिद्दीने आणि मेहनतीने स्वतःला घडवले, तो संघर्ष प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे वडील दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून मिळालेले संस्कार आणि घरातील संगीताचे वातावरण यामुळे त्यांची पायाभरणी भक्कम झाली. त्याचबरोबर त्यांची मोठी बहीण लता मंगेशकर यांच्यासोबतचा सहवासही त्यांच्या कारकिर्दीला दिशा देणारा ठरला.

आशा ताईंनी ११,००० हून अधिक गाणी गायली, हा विक्रम स्वतःमध्येच एक अद्वितीय शिखर आहे. जीनियस वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये नोंद झालेला हा पराक्रम त्यांच्या अथक परिश्रमाची साक्ष देतो. 'दम मारो दम', 'पिया तू अब तो आजा', 'चुरा लिया है तुमने' यांसारखी गाणी केवळ लोकप्रिय नव्हे, तर सांस्कृतिक स्मरणात कोरली गेलेली आहेत.

त्यांच्या कारकिर्दीतील विविध टप्प्यांवर त्यांनी अनेक पुरस्कारांनी सन्मान मिळवला. दादासाहेब फाळके पुरस्कार, पद्मविभूषण यांसारखे सर्वोच्च सन्मान त्यांच्या कार्याची दखल घेणारे ठरले. सात फिल्मफेअर पुरस्कार आणि राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांनी त्यांच्या प्रतिभेला अधोरेखित केले.

आज त्यांच्या निधनाच्या बातमीने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला असला, तरी त्यांचा आवाज मात्र अमर आहे. मोठ्या झाडाच्या सावलीत लहान झाड फारसे वाढत नाही या उक्तीला तीने चुकीचे ठरवले, हयातभर अपार कष्ट उपसत आणि स्वर साधना करीत, दीनानाथ मंगेशकर यांच्यासारख्या आक्रमक, पल्लेदार गायकी असलेल्या गुणी आणि प्रतिभाशाली गायकापोटी जन्म घेण्याचे सौभाग्य इतर भावांडा प्रमाणेच तिला ( ) ही लाभले, मात्र साक्षात सरस्वतीचा दैवी अंश असलेल्या ''लता दीदींच्या मोठ्या झाडाच्या सावलीत राहण्याचा आणि वाढण्याचा शाप घेऊनच ती जगली, वावरली आणि यशाच्या एकेक पायऱ्या चढत स्वतःचे झाड ही तीने महावृक्षात रूपांतरित केलें ते आपल्या जादुई गोड गळ्याने आणि संगीतातील () सर्व प्रकारच्या चालीत सारख्याच सहजतेने लीलया केलेल्या गायकीने. त्यांच्या आवाजात ''लता दीदी आणी रफी यांच्यासारखीच अफाट रेंज होती म्हणूनच अभंग, नाट्य, करुण, शृंगार, कॅबरे लोकगीत अशी सर्वच ढंगात असलेली हजारो गाणी तीने अश्या काही जोशात आणि अवेशात सादर केली कि ती गाणी ''पडदा, सिनेमा, गीतकार, संगीतकार यांना छेदन देत तिची स्वतःची झाली, तिच्या ''आशा गाण्यांचे ''असे एक स्वतंत्र लोभस नाणे गोल्डन इरातील गाण्यात पडले. हंसराज बहेल (ज्याने लताला ''जब रात नही कटती जिंदगी कैसे कटेगी सारखे अवीट गोडीचे गाणे दिले (जेवरात या सिनेमांत )त्या बहेल ने तिला पहिले स्वतंत्र हिंदी सोलो गाणे दिले त्यापूर्वी दहाव्या वर्षी तीने पार्श्वगायन केलें होते आणि नंतर गीता दत्त, आणी जोहराबाई यांसोबत गायली होती पण नंतर तीने मागे वळून पाहिले नाही, तिचा कलाप्रवास सोपा नव्हताच, काटेरी मार्गाने त्यांना कायम चालत रहावे लागले, गाणी मिळवण्यासाठी खूप धडपड करावी लागली, कारण खरी स्पर्धक घरातच होती ''लता दीदी यांच्या रूपात.

संगीताच्या प्रत्येक सुरात, प्रत्येक ठेक्यात आणि प्रत्येक भावनेत आशा ताई कायम जिवंत राहतील. त्यांनी घालून दिलेली परंपरा आणि उभा केलेला आदर्श पुढील पिढ्यांसाठी दीपस्तंभ ठरेल.

आशा भोसले यांचे आयुष्य हे केवळ यशाची कहाणी नाही, तर संघर्ष, जिद्द आणि अखंड साधनेचे प्रतीक आहे. त्यांच्या जाण्याने एक युग संपले असले, तरी त्यांच्या सुरांची परंपरा कधीही संपणार नाही. भारतीय संगीतविश्व त्यांचे सदैव ऋणी राहील.

## सेवापूर्ती निमित्त गौरव सोहळा; पोलीस उपनिरीक्षक मुकुंद तांदळे यांचा सन्मान



बीड । प्रतिनिधी

**पोलीस दलात मुकुंद तांदळे यांनी उल्लेखनीय काम केले आहे. तपासात त्यांची कामगिरी मोलाची राहिली. यापुढे कुटुंबासाठी आणि विधायक कार्यासाठी वेळ द्यावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी केले.**

आर्थिक आर्थिक गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक मुकुंद तांदळे यांच्या सेवापूर्ती सोहळ्याच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत बोलत होते. यावेळी ह.भ.प. भक्तीराज महाराज म्हणाले, मुकुंद तांदळे यांचे समाजमान्य जीवन आहे. अध्यात्माची ओढ आहे. ज्ञानेश्वरीचे पारायण केले आणि सेवाही त्यांनी केली. त्यांचे जीवन सत्याचे आहे. असे सांगून ह.भ.प. त्यांनी सेवा निवृत्तीमुळे आशीर्वाद दिले. यावेळी सेवानिवृत्त उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वाभर गोल्डे यांनी, तांदळे आणि आम्ही सोबत काम केले. पतसंस्थेच्या तपास कामी आणि न्यायालयीन प्रकरणात उल्लेखनीय कार्य केले, असे सांगून त्यांनी शुभेच्छा दिल्या.अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी कार्यक्रमास भेट देऊन पोलीस उपनिरीक्षक तांदळे यांचा गौरव केला. या कार्यक्रमात या कार्यक्रमात पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र गर्जे, पत्रकार नारायण नागरे, बाळासाहेब नागरे, ढाकणे, मोराळे, सुमन खांडे, कु. त्वरिता मुकुंद तांदळे आदींनी गुणगौरव करणारी भाषणे झाली. कार्यक्रमास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंट्टेवाड, गणेश शाखेचे पोलीस निरीक्षक शेजाळ, शिक्षण महर्षी रामकृष्ण बांगर, सरकारी वकील ॲड. अजय तांदळे, ह.भ.प. बालाजी कवठेकर, मोहन शिरसाट, आदीसह पोलीस अधिकारी कर्मचारी मित्रपरिवार नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्तीसगड जुनिअर चॅम्पियनशिप सुमितकुमारची सुवर्ण कामगिरी

माजलगाव। प्रतिनिधी



छत्तीसगड येथे दि ११ एप्रिल रोजी नुकत्याच राष्ट्रीय जुनिअर चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धा पार पडल्या. सदरील राष्ट्रीय जुनिअर चॅम्पियनशिप स्पर्धेत ७० किलो वजन गटात शहरालागत असणाऱ्या पुनर्वसित शेलापुरी येथील अष्टपैलू पैलवान सुमितकुमार अप्पासाहेब भारस्कर याने शेवटच्या अंतिम सामन्यात दमदार खेळी करत हरियाणा येथील मल्लास पराभूत करून सुवर्णपदकावर आपल नाव कोरत सुवर्ण कामगिरी केली. सदरील स्पर्धेसाठी कोच नरेंद्र कुमार, समीर देसाई, अनिरुधसर, कांबळे सर यांनी मार्गदर्शण केले.अतिशय संघर्षातून कुठलीही आखीव रेखीव पार्शवभूमी नसताना पैलवान सुमितकुमार भारस्कर याने आपल्या जिद्दीच्या जोरवार प्रचंड मेहनतीने विविध स्पर्धेत अनेक सुवर्ण पदकांची कमाई केली असून, सध्या सुमितकुमार हा रुस्तुम ए हिंद पै अमोल बचूडे कुस्ती संकुल येथे कुस्तीचे प्रशिक्षण घेत असून, तो सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे.तसेच लवकरच तो आपल्या देशासाठी इंटरनॅशनल खेळणार असून,आंतरराष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्याला प्रतिनिधित्व मिळणार असल्याने या सुवर्ण कामगिरी बद्दल पैलवान सुमिकुमारचे सामाजिक, राजकीय तसेच विविध समाज माध्यमातून त्याच्यावर शुभेच्छा चा वर्षाव होत असून, सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## जिरेवाडी येथील सालशिद बाबा यात्रोत्सव उत्साहात



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील जिरेवाडी येथे सालशिद बाबा यात्रेला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली असून परिसरातील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यात्रेच्या पहिल्याच दिवशी गावातील तरुणांनी पायी गोदावरी नदीवर जाऊन कावडीने पवित्र पाणी आणले. हे पाणी मंदिरात आणून भक्तिभावाने सालशिद बाबांना जलाभिषेक करण्यात आला. यानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात लेझीम खेळत सालशिद बाबांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. तसेच रात्रीच्यावेळी छबीना मिरवणुकीने यात्रेचे वैभव अधिक खुलून आले. या सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. ही यात्रा म्हणजे परिसरातील श्रद्धाळूंसाठी एक पर्वणीच मानली जाते. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी आज सोमवारी दुपारी ४ वाजता भव्य कुस्ती दंगल आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत तालुक्यातील नामांकित मल्ल सहभागी होणार असून दरवर्षीप्रमाणे यंदाही कुस्तीप्रेमींची मोठी गर्दी अपेक्षित आहे. जिरेवाडी ग्रामस्थांच्या वतीने पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सत्ता आमची लालसा नसून समाज संघटन आमचे उद्दिष्ट आहे-आ.संजय केनेकर

जालना । प्रतिनिधी



भारतीय जनता पार्टी कार्यालय, जालना येथे दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता भाजपा जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्हा या दोन्ही जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी नवनियुक्त लोकप्रतिनिधी, सर्व आघाड्यांचे संयोजक यांची महत्वपूर्ण बैठक आ.नारायण कुचे व भास्कर आबा दानवे या दोन्ही जिल्हाध्यक्षांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाली. यावेळी बोलताना आ.संजय केनेकर म्हणाले की, सत्ता आमची लालसा नसून सर्व समाज संघटन करून अखंड भारतभर सर्व समाज एका ठिकाणी आणून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या स्वप्नातील शेवटच्या घटकातील व्यक्तीचा जिवनस्तर उंचावून त्यांचे स्वप्न साकार करणे हे आमचे उद्दिष्ट आहे, असे ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पदवीधर मराठवाडा नोंदणी प्रमुख मधुकरराव देशमुख, भाजपा जेष्ठ नेते माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर पाटील भांदरगे, विश्वजित खरात, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगी देशपांडे, , जिल्हा सरचिटणीस अनिलराव कोलते, सुनील पवार, गोविंद ढेंबरे, वसंत शिंदे, शिवप्रकाश चितळकर, अरुणा जाधव, जिल्हा उपाध्यक्ष आनंद झा, सिद्धिविनायक मुळे, माजी जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, महेश निकम, संजय डोंगरे, भगवान मात्रे, नाना भागिले, राजू साळवे, नगरसेवक अर्जुन गेही यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ.केनेकर म्हणाले की, भारतीय जनता पार्टी ने मंडळ स्तरापर्यंत कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग घेऊन वैचारिक अधिष्ठान, पक्षाचा इतिहास व विस्तार, संघटना विस्ताराची दृष्टी, आपली कार्यपद्धती, आपल्या सरकारची कामगिरी, बूथ व्यवस्थापन इत्यादी विषयांची मांडणी विषय अभ्यास्काद्वारे प्रशिक्षण वर्गात पदाधिकाऱ्यासमोर मांडून सर्व विषय पदाधिकाऱ्याना सविस्तर समजून सांगण्यात आले. तसेच सोशल मिडिया , नमो ॲप, सरल ॲप या वरती मंडळ प्रशिक्षणास उपस्थिती असलेल्या उपस्थितांची नोंदणी प्रदेश स्तरापर्यंत करण्यात आलेली आहे. यावेळी ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे व महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी जिल्ह्यात झालेले प्रशिक्षण वर्ग व आगामी होत असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती पूर्व तयारी तसेच नारी वंदन अभियान पूर्व तयारी याची सविस्तर माहिती प्रदेश सरचिटणीस व जालना जिल्हा प्रभारी आ.संजयजी केनेकर यांच्यासमोर सांगितली. यावेळी दुर्गेश कुरील, सोमेश काबलिये, सतीश केळकर, रोहित भुरेवाल, आदींची उपस्थिती होती.

## पान १ वरून...

### खरीपात बोगस बियाणे विक्रेत्यांवर

कीटकनाशकांचा साठा तपासला जात आहे. खत विक्रीतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी 'लिंकिंग' (खतांसोबत इतर उत्पादने सक्तीने विक्री) करणाऱ्या दुकानदारांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले आहे. यासाठी कृषी विभाग 'डमी ग्राहक' पाठवून गुप्त तपासणी करणार आहे. अशा प्रकारात दोषी आढळणाऱ्यांवर तत्काळ कारवाई केली जाईल.ङ्गतसेच, पीओएस मशीनमधील नोंदवलेला साठा आणि प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत आढळल्यास संबंधित विक्रेत्याचा परवाना रद्द करण्याचा इशारा देण्यात आला आहे. खत विक्रीत पारदर्शकता आणण्यासाठी आधार लिंक अनिवार्य करण्यात आली असून, आधार पडताळणीशिवाय खत विक्री करता येणार नाही. सर्व व्यवहार ई-पॉस मशीनद्वारे नोंदविणे बंधनकारक करण्यात आले आहे. अलीकडे काही ठिकाणी शेतकऱ्यांचा अंगठा घेऊन अधिक खत दिल्याची नोंद करून प्रत्यक्षात कमी खत देण्याचे प्रकार समोर आले होते. त्यामुळे ग्राहकाचे नाव, खताच्या गोण्यांची संख्या आणि बिल यामध्ये सुसंगती राखणे तसेच साठ्याचा अचूक हिशोब ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांनाही सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अधिकृत परवानाधारक विक्रेत्यांकडूनच बियाणे व खते खरेदी करावी, बिल घ्यावे आणि कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास त्वरित संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. यंदाच्या खरीप हंगामात बोगस व्यवहारांना आळा घालून शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे चित्र दिसत आहे.

-------------

### अशोक खरात प्रकरण साधे नाही, येणाऱ्या

नेत्यांची माहिती आता समोर आली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणजे काही सुधाकरराव नाईक नाहीत,'' असा टोलाही त्यांनी टोला लगावला. जागतिक स्तरावर महायुद्ध संपवण्यासाठी तीन राष्ट्रे आणि काही प्रमुख नेते एकत्र आले आहेत, याकडे लक्ष वेधताना राऊत म्हणाले की, ''हे जगातील सर्वात मोठे पाऊल आहे. मात्र, आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिकडच्या प्रसिद्धी साहित्यावर किंवा बॅनरवर तिथल्या पंतप्रधानांचे किंवा राजकारण्यांचे फोटो नाहीत. हे एक आदर्श चित्र आहे. भारतात असे इव्हेंट असते, तर भाजपने आधीच कमळ छापून संपूर्ण देश बॅनरने रंगवून टाकला असता. पंतप्रधान मोदींनी जागतिक घडामोडींमधील भान काय असते, हे यावरून शिकले पाहिजे,'' असा टोलाही त्यांनी लगावला. 'आजकाल या देशात फक्त फडणवीस आणि त्यांच्या लोकांचाच हिंदुत्वाशी संबंध उरला आहे, असे त्यांना वाटते. बाकी आम्ही सगळे जणू काही बाहेरून आलो आहोत. बाळासाहेब ठाकरेंनी महाराष्ट्रात हिंदुत्व रुजवले आणि फडणवीसांना जगायला शिकवले, त्यांचे योगदान भाजप विसरली आहे. भाजपचे हिंदुत्व आता केवळ खरात आणि येरेंडे बुवा सारख्यांचे राहिले आहे, जे आम्हाला कधीही मान्य नाही. खऱ्या हिंदुत्वाचा विचार तर शंकराचार्य त्यांच्या मठात बसून मांडत आहेत,'' अशी टीका राऊत यांनी केली. एका केंद्रीय मंत्र्याने आयोजित केलेल्या भोजनाच्या कार्यक्रमाला काही खासदार उपस्थित राहिले होते. यावर बोलताना राऊत म्हणाले की, ''खासदार जेवायला गेले म्हणजे ती काही डिनर डिप्लोमेसी होत नाही. तो केवळ एक जेवणाचा कार्यक्रम होता, त्याला राजकीय अर्थ देण्याची गरज नाही.

----------------

### ज्येष्ठ गायिका आशा भोसले

गायली आहेत. गझल, भजन, पॉप आणि शास्त्रीय अशा सर्व शैलींत त्यांनी त्यांच्या सदाबहार आवाजाची जादू चाहत्यांच्या मनात कायम ठेवली. त्यांना राष्ट्रीय पुरस्कारासह फिल्मफेअर, दादासाहेब फाळके आणि पद्मविभूषण आदी प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. ज्येष्ठ संगीतकार खय्याम यांच्या उमराव जान (१९८१) मधील दिल चीज क्या है गाण्यासाठी आशाताईंना पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. तर त्यांना दुसरा राष्ट्रीय पुरस्कार १९८६ मधील इजाजत चित्रपटातील मेरा कुछ सामान गाण्यासाठी मिळाला होता. त्या १९९७ मध्ये ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळालेल्या पहिल्या भारतीय गायिका ठरल्या. २००१ मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आशा भोसले यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीतप्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांची मने जिंकली. त्यांच्या भावपूर्ण गीतांपासून ते सदाबहार आवाजात एक अजरामर प्रतिभा होती. त्यांच्या कुटुंबीयाप्रती माझ्या संवेदना. त्या पिढ्यानपिढ्या प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सदैव अजरामर राहतील. अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी आशाताईंना श्रद्धांजली वाहिली आहे.

----------

### न्याय मिळवण्यातील अडथळे हे मोठे

भारताकडे अधिकार आणि धोरणांची एक भक्कम चौकट उपलब्ध आहे. मात्र, भौगोलिक अंतर आणि अंमलबजावणीतील सुसूत्रतेच्या अभावामुळे हे लाभ गरजूंपर्यंत पोहोचत नाहीत. न्यायाचे केवळ अस्तित्वात असणे पुरेसे नाही, तर तो शेवटच्या नागरिकाच्या दारापर्यंत वेळेत पोहोचला पाहिजे. एखाद्या प्रजासत्ताकाचे सामर्थ्य हे तिथे घोषित केलेल्या अधिकारांवरून नव्हे, तर प्रत्यक्षात किती लोकांना ते अधिकार मिळाले, यावरून मोजले जाते, असे त्यांनी ठामपणे सांगितले. लडाखमधील लष्करी जवान, श्रीनगर आणि नागालँडमधील आदिवासी समुदाय तसेच केरळमधील मच्छिमार बांधवांसोबतच्या आपल्या संवादाचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, नागरिकांना त्यांचे हक्क माहित नसतात असे नाही, तर ते हक्क मागण्यासाठी त्यांच्याकडे हक्काचे व्यासपीठ नसते. यावर उपाय म्हणून त्यांनी विधी साहाय्य योजना, जनजागृती मोहिमा आणि बहु-सेवा शिबिरांचे आयोजन करण्यावर भर दिला.

-----------

### अमेरिकेत उभारला स्वामी

भारतीय मूर्तीकार नरेश कुमार कुमावत यांनी हा पुतळा घडवला आहे. शिकागो येथे १८९३ साली झालेल्या सर्वधर्मपरिषदेत स्वामी विवेकानंदांचे भाषण जगप्रसिद्ध आहे.

------------

### इराण-अमेरिका शांतता

कोणत्याही कराराशिवाय वॉशिंग्टनला परतत आहोत. मिळालेल्या माहितीनुसार, चर्चा प्रामुख्याने खालील तीन मुद्द्यांवर अडकली असल्याचे समजते इराणने अण्वस्त्रे बनवणार नाही, याचे लेखी आश्वासन द्यावे ही अमेरिकेची मुख्य अट होती. जागतिक तेल व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा सागरी मार्ग पूर्णपणे खुला करण्याबाबत इराणने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. इराणने त्यांच्यावर लादलेले निर्बंध तातडीने हटवण्याची मागणी केली होती, जी अमेरिकेने फेटाळून लावली. जेडी व्हान्स यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, करार न होणे ही अमेरिकेपेक्षा इराणसाठी अधिक वाईट बातमी आहे. आम्ही आमच्या 'रेड लाईन्स' स्पष्ट केल्या आहेत आणि त्याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. दुसरीकडे, इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेवर 'अवाजवी मागण्या' केल्याचा आरोप केला आहे. इराणने म्हटले आहे की, तांत्रिक स्तरावर चर्चा सुरूच राहील, मात्र अमेरिकेने आपली भूमिका लवचिक ठेवणे आवश्यक आहे. या चर्चेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. आता ही बोलणी फिस्कटल्यामुळे जागतिक बाजारात तेलाच्या किमती वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच, दोन आठवड्यांपूर्वी जाहीर झालेला तात्पुरता युद्धविराम किती काळ टिकेल, याबाबतही आता साशंकता निर्माण झाली आहे.

---------

### स्कूल बसवाल्यांच्या मनमानीला

सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. दरम्यान, प्रत्येक शाळेत स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी कार्यरत राहणार असून, ती भाडे, सुरक्षितता आणि सेवा यासंबंधी पालकांच्या तक्रारींचे निवारण करेल. तसेच तिमाही अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणे आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, डिजिटल उपस्थिती नोंद, स्वयंचलित अलर्ट आणि पालकांना थेट माहिती मिळणार आहे. राज्यस्तरीय प्लॅटफॉर्मशी या प्रणालीचे एकत्रीकरणही करण्यात येणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची चढ-उतार वेळेसह दैनिक उपस्थिती नोंदवणे बंधनकारक असेल. विशेषत: पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक (इयत्ता पाचवीपर्यंत) विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक प्रवासात महिला परिचारिका किंवा नियुक्त कर्मचारी असणे आवश्यक राहील. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षित कर्मचारी, सुलभ प्रवेश व्यवस्था आणि आवश्यक तेव्हा पालक/शिक्षक उपस्थितीची तरतूद करण्यात आली आहे.

**कर्मचाऱ्यांची काटेकोर पडताळणी**

बस चालक, वाहक व इतर कर्मचा-यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. सर्व नोंदी तपासणीसाठी उपलब्ध ठेवणे बंधनकारक असेल. नवीन नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत सर्व शालेय वाहने नियमांनुसार सुसज्ज करणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधित वाहनांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**संयुक्त तपासणी यंत्रणा**

शालेय वाहतुकीची नियमित तपासणी शिक्षण व परिवहन विभाग संयुक्तपणे करणार असून, त्याचे अहवाल जिल्हा पातळीवरील समितीकडे सादर केले जातील. या सुधारित नियमांमुळे शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि तंत्रज्ञानाधारित होणार असून, पालक आणि विद्यार्थ्यांचा विश्वास अधिक दृढ होणार असल्याची भावना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली आहे.

------------

### बालीन शहानी केले ते नरेंद्र

खासगी शाळांवर थेट प्रतिबंध घालण्याचा निर्णय अद्याप तरी भारतात झालेला नाही. बालीन यांनी नेपाळमधील व्हीआयपी कल्चर पूर्णपणे मोडीत काढण्यासाठी मंत्र्यांचा मोठा ताफा आणि सुरक्षा व्यवस्था कमी केली आहे. ते स्वतः साधेपणाने लोकांमध्ये वावरताना दिसतात. भ्रष्टाचाराविरुद्ध त्यांनी थेट मोहीम उघडली असून कामचुकार अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा धडाका लावला आहे. मोदींनी भारतात लाल दिवा संस्कृती बंद करून व्हीआयपी संस्कृतीला मोठा धक्का दिला. मात्र, भारताची सुरक्षा परिस्थिती आणि लोकसंख्या पाहता पंतप्रधानांसह महत्त्वाच्या मंत्र्यांची सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक असते. मोदींनी ''मी प्रधान सेवक आहे'' ही भावना रुजवली असली तरी, प्रोटोकॉल आणि सुरक्षा यामुळे बालीन शाह यांच्यासारखा पूर्णतः अनौपचारिक वावर भारतात आव्हानात्मक आहे. बालीन शाह हे फेसबुक आणि सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून ते थेट जनतेशी संवाद साधतात. पत्रकार परिषदांपेक्षा ते थेट कृती करण्यावर भर देतात. तरुणांमध्ये त्यांची लोकप्रियता प्रचंड आहे. तर मोदी हे सोशल मीडियाचे मास्टर मानले जातात. मन की बात सारख्या कार्यक्रमातून ते थेट जनतेशी संवाद साधतात. बालीन शाह यांच्याप्रमाणेच मोदींनीही आपली एक ब्रँड इमेज तयार केली आहे, ज्याचा प्रभाव देशातील तरुणांवर मोठ्या प्रमाणात आहे. भारतातील अनेक नागरिकांना वाटते की, मंत्र्यांची सुरक्षा आणि खासगी शाळांची वाढती फी यावर बालीन शाह यांच्यासारखाच सर्जिकल स्ट्राईक होणे गरजेचे आहे. जर भारततही सरकारी अधिकाऱ्यांच्या पाल्यांना सरकारी शाळेत शिकणे बंधनकारक केले, तर सरकारी शाळांचा दर्जा रातोरात सुधारेल, हे बालीन शाह यांच्या भूमिकेतून स्पष्ट होते. बालीन यांनी सुरू केलेली प्रॉमिस ट्रॅकिंग सिस्टिम (दिलेल्या आश्वासनांचा मागोवा घेणे) भारतासारख्या मोठ्या लोकशाहीत लागू झाल्यास जनतेचा नेत्यांवरील विश्वास वाढेल. आज नेपाळच्या पंतप्रधानांनी घेतलेले निर्णय धाडसी वाटतात अगदी त्याचप्रमाणे भारततही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी असे निर्णय घ्यावेत असे अनेकांना वाटते परंतु निर्णय घेण्याची क्षमता मोदी मध्ये अधिक असल्याचे दिसते थेट निर्णय घेण्यापेक्षा त्याचे परिणाम पाहणे गरजेचे आहे आणि निर्णय घेताना ते निर्णय योग्य अमलात आणलेच पाहिजे या पद्धतीने भारताचे पंतप्रधान मोदी विचार करतात हे त्यांच्या कार्यपद्धतीवरून दिसून येते. आज नेपाळच्या पंतप्रधानांचा देश आणि जगभर गाजावाजा होत असला तरी त्याच पद्धतीने आपल्याही देशात कार्यपद्धती अमलात यावी अशी भावना जगभरातील नेत्यांची आहे. परंतु भौगोलिक दृष्ट्या नेपाळ हा छोटा देश असल्याने या ठिकाणी असे निर्णय घेतले तर ते अमलातही येऊ शकतात परंतु भौगोलिक दृष्ट्या मोठे देश असलेल्या ठिकाणी असे निर्णय तातडीने केले योग्य ठरणार नाही त्यासाठी वेळ योग्य नियोजन गरजेचे आहे. बालीन शाह हे क्रांतिकारी बदल करणारे नेते म्हणून समोर येत आहेत, तर नरेंद्र मोदी हे व्यवस्थेत राहून बदल करणारे नेते आहेत. नेपाळ छोटा देश असल्याने तिथे हे प्रयोग लवकर यशस्वी होऊ शकतात, मात्र भारतासारख्या अवाढव्य देशात अशा निर्णयांची अंमलबजावणी करणे अधिक जिकिरीचे आहे. तरीही, बालीन शाह यांच्या धाडसी निर्णयांनी भारतासाठी एक नवा आदर्श नक्कीच निर्माण केला आहे.

----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६


## थोडक्यात



माजलगाव : कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे सचिव हरिभाऊ सवणे साहेब व सर्व अधिकारी कर्मचारी बांधव

## माजलगाव वकील संघात महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील माजलगाव वकील संघामध्ये क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वकील संघाचे उपाध्यक्ष अॅड.एम.एन.जाधव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वकील संघाचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.एस.के.गोंडे,ॲड. आर.आर.टाकणखार ॲड.साबळे,यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमात ॲड.बलराज शिंदे,ॲड.एम.एन.जाधव यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जिवनाविषयी मनोगत व्यक्त केले.सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वकील संघाचे सचिव ॲड.नारायण तेलगड,ॲड.पी.आर.खेत्री, ॲड.विजय मस्के ॲड.अर्जुन शिंदे,ॲड.कोरडे यांनी परिश्रम घेतले.





## मोठेवाडीत महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर चौकात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमत: महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी मा.जि.प.सदस्य शिवप्रसाद खेत्री, मा.प.स.सदस्य सुर्यकांत खेत्री, मा.सरपंच विष्णु खेत्री, ग्रामसेवक बिभीषण डोरले, उपसरपंच अंगद खेत्री,राजेभाऊ सरवदे, मा.चेअरमण भारत खेत्री, संभाजी पास्टे, समता परिषदेचे तालुका अध्यक्ष जगन्नाथ खेत्री, विलास खेत्री, ज्ञानेश्वर खेत्री,प्रा.डॉ. कुंडलिक खेत्री,अशोक रासवे,विलास जाधव,सोमेश्वर हिवरकर गणेश सर्जे, भगवान रोकडे, गेना कदम, विशाल खेत्री, ऋषिकेश रासवे, शाळेतील सर्व शिक्षक व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

# नागरिकांच्या समस्यांवर प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी -आ.धस

अमळनेर । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान अंतर्गत अंमळनेर येथे आयोजित शिबिरास अध्यक्ष म्हणून आ.सुरेश धस हे होते . तहसील कार्यालय पाटोदा, महसूल अधिकारी-कर्मचारी संघटना तसेच मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी मंडळ विभाग, अंमळनेर यांच्या उत्कृष्ट नियोजनातून हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

या शिबिरामध्ये नागरिकांच्या विविध महसुली अडचणींवर त्वरित मार्गदर्शन व निपटारा करण्यात आला. जन्म-मृत्यू दाखले, सातबारा दुरुस्ती, भोगवटदार वर्ग-२ जमीन प्रकरणे, ई-पीक पाहणी, क्शन ग्रीस्टॅक, संजय गांधी व श्रावणबाळ योजना, ई-शिधापत्रिका, डिजिटल सातबारा वाटप, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांनी मांडलेल्या विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः संजय गांधी, श्रावणबाळ, एकल महिला व निराधार भत्ता योजनांमध्ये आधार के.वाय.सी. व व्हेरिफिकेशन संदर्भातील प्रलंबित तक्रारींचा तातडीने निर्णय व्हावा, अशी मागणी करण्यात आली. डिजिटल सातबाऱ्यामधील चुका, क्षेत्रफळातील तफावत, सर्वे व गट नंबरमध्ये झालेल्या बदलांबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत असून त्यांचा तत्काळ निपटारा करण्याबाबतही प्रशासनास सूचना देण्यात आल्या. तालुका स्तरावर जात प्रमाणपत्र व त्याच्या पडताळणीसाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने नागरिकांना भेडसावणाऱ्या



अडचणी दूर करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. तसेच शेतरस्ते, वस्ती रस्ते व अतिक्रमण हटवून त्यांची कायमस्वरूपी नोंद सातबाऱ्यावर करण्यात यावी, यासाठी भूमी अभिलेख व महसूल विभागाने संयुक्तरीत्या कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे नमूद केले. तालुक्यातील विविध प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप मावेजा न मिळाल्याने निर्माण झालेला तणाव दूर करून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करावा, तसेच एस.आय.आर.-२ अंतर्गत स्थलांतरित, मृत व एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंद असलेल्या मतदारांच्या नोंदी दुरुस्त करून प्रभावी मतदार यादी तयार करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या फार्मर आयडी संदर्भातील अडचणी-मोबाईल नंबर लिंक नसणे, क्षेत्रफळातील बदल-यामुळे महा-डीबीटी अंतर्गत मिळणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यात येणाऱ्या अडथळ्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचेही सुचविण्यात आले.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले. शेतजमिनींचे नुकसान, विहिरींची हानी, पशुधन मृत्यू तसेच व्यापारी बांधवांच्या वस्तू व मशिनरीच्या नुकसानीची भरपाई अद्याप मिळालेली नसल्याने ती तातडीने वितरित करावी, अशी मागणी केली.

यासोबतच ऊसतोडणी कामगारांची नोंदणी व ओळखपत्र देण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली, जेणेकरून अपघाती घटनांमध्ये त्यांना आर्थिक व वैद्यकीय मदत मिळू शकेल. तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत पूर्वी उभारण्यात आलेले बंधारे व तलाव सध्या नादुरुस्त अवस्थेत असल्याने त्यांची नरेगा व उडठ निधीच्या माध्यमातून दुरुस्ती करून सिंचनासाठी उपयोगात आणण्याबाबतही सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली.एकूणच, या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याचा प्रयत्न झाला असून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक दृढ झाला.याप्रसंगी मा. विवेक जॉन्सन (जिल्हाधिकारी, बीड), मा. जितीन रहेमान (मुख्य कार्यकारी अधिकारी), मा. हरिष धार्मिक (अप्पर जिल्हाधिकारी), मा. शिवकुमार स्वामी (निवासी उपजिल्हाधिकारी) यांच्यासह उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, तहसीलदार कृष्णा शिंदे, गटविकास अधिकारी दत्तात्रय निलावाड तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सलग १८ तास अभ्यासातून महामानवांना अभिवादन

### तुलसी शैक्षणिक समूहाचा उपक्रम; तब्बल १२५४ वाचकांचा उत्स्फूर्त सहभाग

बीड । प्रतिनिधी

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधत तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने शनिवारी तुलसी संकुलात 'सलग १८ तास अभ्यास' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी ६.०० ते रात्री १२.०० या कालावधीत पार पडलेल्या या उपक्रमाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल १२५४ विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी एकाच वेळी शिस्तबद्ध अभ्यास करत महामानवांच्या विचारांना कृतिशील अभिवादन केले.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने व अभिवादनाने झाली. यावेळी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त मा.रवींद्र जोगदंड, तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रा.प्रदीप रोडे, जिल्हा जात



प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीडचे सहाय्यक उपायुक्त मा.उमेश सोनवणे, इतर मागास बहुजन कल्याण बीडचे सहाय्यक संचालक मा.डी.बी.क्षिरसागर, प्राचार्य मा.डॉ.कमलाकर कांबळे, उपशिक्षणाधिरी मा.भगवान सोनवणे, मा. दीपा रोडे आदी मान्यवर उपस्थित होते. उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी विविध मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी 'वाचन संस्कृती विकसित करणे' या विषयावर मार्गदर्शन करत वाचनाचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर प्रा. प्रदीप रोडे यांनी स्पर्धा परीक्षांचे स्वरूप तसेच दहावी व बारावीनंतर उपलब्ध करिअरच्या विविध संधींबाबत सखोल माहिती दिली. दुपारच्या सत्रात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त मा. रवींद्र जोगदंड यांनी 'क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुबंध' या विषयावर प्रभावी मार्गदर्शन करत त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता स्पष्ट केली. उपक्रमासाठी सहभागींसाठी सकाळी चहा व अल्पोपहार, तसेच दुपारी आणि रात्री भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. उपस्थित विद्यार्थ्यांसाठी आवश्यक पुस्तके महाविद्यालयातर्फे उपलब्ध करून देण्यात आली. उपक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्याने तुलसी आयटी कॉलेज येथे जागा अपुरी पडली. त्यामुळे अतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी तुलसी इंग्लिश स्कूल येथे स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आली. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था तसेच मुला-मुलींसाठी सुरक्षित आणि स्वतंत्र बसण्याची सोय करण्यात आली होती. सायंकाळी झालेल्या 'विद्यार्थी मनोगत' सत्रात विद्यार्थ्यांनी या १८ तासांच्या शिस्तबद्ध अनुभवाबद्दल समाधान व कृतज्ञता व्यक्त केली. रात्री ११: ११.३० वाजता प्रमाणपत्र वितरणाने या उपक्रमाची सांगता झाली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. प्रियांका रोडे, प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे, डॉ. अश्विनी बेद्रे, डॉ. विजयकुमार बांदल, उमा जगतकार, प्रा. प्रकाश ढोकणे, प्रा. डी. डी. राऊत, प्रा. शुभम जोगदंड, डॉ. सुनील जोंधळे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा. किशोर वाघमारे यांनी मानले.

## पान ६ वरुन...

### अंकुश नगर येथील युवा

'सत्यशोधक' विचारांचा जागर करत त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. युवा पिढीने महापुरुषांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून सामाजिक परिवर्तनासाठी आणि शैक्षणिक प्रगतीसाठी पुढे यावे, असा सूर या प्रसंगी उमटला. सामूहिक बुद्ध वंदना घेऊन आणि महापुरुषांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. युवा कार्यकर्त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवण्यासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांचे 'सत्यशोधक' विचार हे केवळ पुस्तकात न राहता, आजच्या तरुण पिढीने ते कृतीत आणणे काळाची गरज आहे. अंकुश नगरमधील युवा कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन हा जो अभिवादन सोहळा आयोजित केला, तो याच विचारांच्या वारशाचा एक भाग आहे. युवकांनी संघटित होऊन सामाजिक परिवर्तनासाठी पुढाकार घेणे, हीच महात्मा फुले यांना खरी अभिवादन ठरेल.

(ॲड. आदर्श जाधव)

### शामराव अण्णा पोकळे

त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार रोजी दुपारी ३ वाजता त्यांच्या शेतामध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी ह भ प बजुगडे महाराज , जिल्हा परिषद सदस्य माऊली आप्पा जरांगे , सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब अण्णा भवर, परिसरातील आजी-माजी सरपंच , उपसरपंच, सर्व क्षेत्रातील नागरिक अधिकारी, पदाधिकारी, शिक्षक, व्यापारी , पत्रकार, वारकरी संप्रदाय , नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते, नानाच्या आत्म्यास शांती लाभो नानांना सर्वांनी मिळून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलं व सुना , भाऊ, पुतणे , नातवंड असा परिवार आहे.

### मराठवाडा विभागात

अनेक कार्यकर्त्यांची होती, त्या अनुषंगाने पक्षाचे सरचिटणीस मा. आमदार भाई जयंत पाटील यांच्या आदेशान्वये मराठवाडा विभागाची जबाबदारी भाई मोहन गुंड यांच्यावर सोपवण्यात आली असल्याची माहिती पक्षाचे कार्यालयीन चिटणीस भाई ड.राजेंद्र कोरडे यांनी या संदर्भातील पत्र भाई मोहन गुंड यांना दिले आहे. या पत्रानुसार मराठवाडा विभागात पक्षाचा दौरा आयोजित करून ग्राम, तालुका व जिल्हा स्तरावर पक्ष संघटन करणे अपेक्षित आहे, पक्ष विस्तारासाठी समित्यांची स्थापना करणे, पदाधिकाऱ्यांची निवड करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी जनसंघटना आघाड्याची स्थापना करून त्यावर पदाधिकारी नेमण्याचे अधिकार ही भाई मोहन गुंड यांना देण्यात आले आहेत. केलेल्या कामाचा सविस्तर अहवाल वेळोवेळी मध्यवर्ती कार्यालयात पाठवण्याच्या सूचना ही देण्यात आल्या आहेत. या निवडीमुळे मराठवाड्यात शेतकरी कामगारांच्या प्रश्नांवर शेकाप अधिक आक्रमकपणे काम करेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. भाई मोहन गुंड हे चिटणीस मंडळाचे सदस्य असून अत्यांत चिकाटीने जिद्दीने प्रमाणीकपणे काम करणारा चेहरा म्हणुन त्याची मराठवाड्यात ओळख आहे. अनेक शेतकरी कामगाराचे यशस्वी आंदोलने त्यांच्या नावावर आहेत, सक्रीय चळवळीतील अनुभवाचा फायदा पक्ष कार्यकर्त्यांना होईल असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे. मराठवाडा विभागासह राज्यभरातून भाई मोहन गुंड यांचं अभिनंदन करण्यात येत आहे, मात्र पुन्हा शेतकरी कामगार पक्ष मराठवाड्यामध्ये उभा करणे हे त्यांच्या समोरील मोठं आव्हान असणार आहे हे मात्र नक्की.

### लाखो ठेवीदारांच्या

राज्य घटना वेगळी आणि केंद्र सरकारची राज्यघटना वेगळी आहे काय? नागरिकांच्या जिवीत आणि वित्ताचे रक्षण करण्याचे घटनात्मक जबाबदारी राज्याची आहे. म्हणुन राज्य सरकारला टोलवा टोलवी करता येणार नाही. अनेक अनावश्यक गोष्टीवर राज्य सरकार हजारो लाखो कोटींची उधळपट्टी करीत आहे. मग जबाबदारीने आपल्या लाखो नागरिकांना संकटातून बाहेर काढण्यासाठी तरतूद केली तर बिघडले कुठे? ठेवीदारांच्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठविणारे सचिनभैय्या उबाळे यांच्या नेतृत्वात मुंबईत ठेवीदारांचे आझाद मैदानावर ठिय्या आंदोलन झाले होते. तेथे काही चमकोगिरी करणारे काही आमदार आले होते. ठेवीदारांसमोर शायनिंग मारून गेले. परंतु त्यांनी विधानसभा अधिवेशनात ठेवीदारांच्या न्यायासाठी चकार शब्दही काढला नाही. मागील अधिवेशनात माजलगावचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी अत्यंत पोटतिडकीने ठेवीदारांचा प्रश्न उपस्थित केला होता. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी अधिवेशन काळात दोन वेळा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेवून ठेवीदारांच्या प्रश्नाची तिव्रता त्यांच्यासमोर ठेवली. म्हणून ज्ञानराधासह इतर बंद पडलेल्या मल्टीस्टेट पतसंस्थांच्या व त्यांच्या संबंधितांच्या सर्व संपत्ती सरकारने जप्त करून ताब्यात घ्याव्यात व ठेवीदारांचे पैसे सरकारने वाटप करावेत व यावर नेमलेले निष्क्रीय अधिकारी तात्काळ बडतर्फ करावेत ते नागरिकांच्या जीवनाशी खेळत आहेत. त्यामुळे ठेवीदारांचा सरकार विरोधात रोष निर्माण होत आहे. अशी ठेवीदारांची मागणी आहे.

### बारा कोटी जनतेसाठी

योजनेत समाविष्ट सर्व शासकीय रुग्णालये, खाजगी रुग्णालये, तसेच ग्रामीण व शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रात या योजनेचा लाभ घेता येतो. त्यासाठी आधार कार्ड: (अपडेटेड आणि मोबाईल नंबर लिंक असलेले).१२ अंकी रेशन कार्ड नंबर: (तहसिल कार्यालयातून अपडेट करून घेतलेला).आयुष्मान कार्ड आवश्यक आहे ज्या रुग्णांची आर्थिक परिस्थिती नाही अशा रुग्णांना या योजनेअंतर्गत सर्व उपचार करण्यासाठी आयुष्यमान भारत योजना तत्पर असते विशेषता डॉक्टर ओमप्रकाश शेटे यांच्यामुळे या योजनेची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली असून त्यांच्यामुळेच अनेक रुग्णांना जीवदान मिळाले आहे.

## रोषनपुरी येथे उद्यापासून निष्काम फिरता अखंड हरिनाम सप्ताह व भावार्थ रामायण

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील रोषनपुरी येथे मंगळवार (दि. १४) पासून निष्काम फिरता अखंड हरिनाम सप्ताह व भावार्थरामायण कथेचे आयोजन केले आहे. या कथेचे प्रवक्ते श्री ह. भ. प. श्रीविष्णू महाराज जगताप अध्यक्ष गीता मंदिर श्री क्षेत्र पैठण व पंढरपूर हे आहेत.

मंगळवारी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री ह. भ. प. नामदेव महाराज घाटुळ रोषनपुरी यांची कीर्तन होणार आहे. दुपारी ४ ते ५ या वेळेत ह. भ. प. परमेश्वर महाराज मोंढे अध्यापक गीता मंदिर पैठण यांचे प्रवचन होणार आहे. रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत श्री ह. भ. प. जगन्नाथ महाराज देशमुख श्री क्षेत्र पंढरपूर यांचे स कीर्तन होणार आहे. बुधवारी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री ह.भ. प. भागवत महाराज शिंदे विश्वस्त गीता मंदिर श्री क्षेत्र पैठण यांचे कीर्तन होणार आहे. दुपारी ४ ते ५ या वेळेत श्री ह. भ. प. प्रकाश महाराज वाघमारे वारोळा यांचे प्रवचन होईल. रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत श्री ह. भ. प.विष्णु महाराज जगताप अध्यक्ष गीता मंदिर श्री क्षेत्र पैठण व पंढरपूर यांचे कीर्तन होईल. गुरुवारी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री ह.भ. प. बन्सी महाराज उबाळे भेंडटाकळी यांचे कीर्तन होईल. दुपारी ४ ते ५ या वेळेत श्री ह.भ. प. तुळशीराम महाराज गरड श्री क्षेत्र पंढरपूर यांचे प्रवचन होईल. रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत श्री ह. भ. प. उमेश महाराज दशरथे श्रीक्षेत्र आळंदी यांचे कीर्तन होईल. शुक्रवारी श्री ह. भ.प. अनिल महाराज पाटील बार्शी यांचे १० ते १२ या वेळेत कीर्तन होईल. दुपारी ४ते ५ या वेळेत श्री ह.भ. प. लक्ष्मण महाराज उबाळे श्री निवृत्तीनाथ महाराज संस्थान शोभानगर यांचे प्रवचन होईल. रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत श्री ह. भ. प. पांडुरंग महाराज घुले अध्यक्ष, गाथा मंदिर श्रीक्षेत्र देहू यांचे कीर्तन होईल. शनिवारी सकाळी ८ ते १० या वेळेत श्री ह. भ.प. संदिपान महाराज शिंदे हासेगावकर अध्यक्ष, वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची यांचे काल्याचे किर्तन होईल. या निष्काम फिरता अखंड हरिनाम सप्ताहाला ५६ वर्षांची परंपरा आहे . यामध्ये कीर्तनकार, प्रवचनकार , भजनी मंडळी, मृदंगाचार्य, गायक गुणीजन मंडळी यांना कुठल्याही प्रकारचे मानधन दिले जात नाही . सर्वजण या सप्ताहामध्ये स्वखर्चाने येऊन आनंदाने सेवा देतात. हे या सप्ताहाचे विशेष वैशिष्ट्य आहे. या अखंड हरिनाम सप्ताहास उपस्थित राहण्याचे आवाहन समस्त गावकरी मंडळी रोषनपुरी यांनी केले आहे.


## प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाचा उल्लेखनीय निकाल


माजलगाव । प्रतिनिधी

परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाने यंदाच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून विद्यार्थ्यांनी उत्तम गुणवत्तेचे प्रदर्शन करत महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे. बीएएमएस द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट टक्केवारी मिळवत यशाची नोंद केली आहे.

परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाचा निकाल ८८.६३% लागला असून या निकालामध्ये भावना शहाजी जाधव हिने ७०.३३% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे.







धनवर्षा दयानंद बिरादार हिने ६९.७६% गुणांसह द्वितीय, तर अंकिता सुरेश उपरे हिने ६९.१९% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.


महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, नियमित अध्यापन पद्धती, तसेच विद्यार्थ्यांची मेहनत आणि चिकाटी यामुळे हा यशस्वी निकाल शक्य झाला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच भविष्यातही अशाच प्रकारे उत्तम निकाल देण्याचा संकल्प महाविद्यालयाने व्यक्त केला आहे.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## म.फुले जन्मोत्सव जयभीम नगरमध्ये उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांचे जन्मोत्सवानिमित्त जय भीम नगर माजलगाव येथील फुले आंबेडकर जन्मोत्सव समितीच्या वतीने मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मोत्सवाच्या सुरुवातीला महात्मा ज्योतिबा फुले यांना बाबासाहेब आंबेडकरांनी गुरु का मानले या विषयावर सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्राध्यापक संजय बागुल यांचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक जय भीम नगर माजलगाव सायंकाळी सात वाजता आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाचा विषय होता महात्मा ज्योतिबा फुले यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी गुरु का मानले

आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात बोलताना प्राध्यापक संजय बागुल म्हणाले की बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक मुक्कामी १९५१ साली सांगितले की माझे पहिले गुरु तथागत भगवान गौतम बुद्ध आहेत दुसरे गुरु संत कबीर आहेत व तिसरे गुरु महात्मा ज्योतिबा फुले हे आहेत हे तिन्ही महापुरुष यांची व बाबासाहेब आंबेडकरांची प्रत्यक्ष जीवनात कधीही भेट झालेली नव्हती व ते वेगवेगळ्या जातींचे होते परंतु त्यांचे विचार वाचनात येऊन त्यांच्या विचार बाबासाहेबांच्या विचाराची मिळाल्याने बाबासाहेबांनी त्यांना गुरु मानले. बाबासाहेब आंबेडकरांच्या तिन्ही गुरु पैकी पहिले गुरु सिद्धार्थ गौतम बुद्ध यांनी रोहिणी नदीच्या पाण्यासाठी दोन राज्यांमध्ये युद्ध न करता ग्रह त्याग केला तर दुसरे गुरु महात्मा ज्योतिबा फुले यांनी अस्पृश्यांना पाण्यासाठी आपला स्वतःच्या मालकीचा हौद रिकामे केला या आपल्या गुरूंचा आदर्श घेऊनच बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह पाण्यासाठी केला





महात्मा फुले हे गरीब नव्हते फार श्रीमंत होते परंतु ते माळी या शूद्र जाती जन्माला आलेले असल्याने त्यांच्या मित्राच्या लग्नातून महात्मा फुलेंना हाकलून देण्यात आले होते त्याचा विचार करून मंथन करून महात्मा फुलेंनी या जाती कोणी व कशा निर्माण केल्या याचा शोध लावला व त्यांच्या लक्षात आले की जाती या निर्मिकाने निर्माण केलेल्या नसून माणसानेच त्याच्या स्वार्थासाठी जाती निर्माण केलेले आहेत म्हणून त्यांनी सर्व मानव महिला व पुरुष हे समान असले पाहिजेत ही शिकवण दिली. तसेच मनुस्मृतीनुसार महिलांना पतीच्या निधनानंतर सती जावे लागत असे त्यांचे केस ओपन केल्या जात असे व त्यांना विविध प्रकारचे बंधने टाकण्यात आलेले आहेत असेच एक ब्राह्मण समाजातील विधवा महिला काशीबाई या विधवेला नवरा वारल्याच्यानंतर गर्भवती राहिल्याने आत्महत्या करण्याचा प्रसंग आला होता महात्मा फुलेंनी त्या काशीबाई नावाच्या ब्राह्मण महिलेला आपल्याकडे आणले व तुझा एक भाऊ म्हणून तुझ्या मुलाचे पालन पोषण करीन असे सांगून विधवा महिलांना गर्भवती राहिल्यानंतर प्रसूती करून घेण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक ग्रह काढले.

महात्मा फुलेंचे शिष्य म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये महिलांसाठी हिंदू कोड बिल निर्माण करून महिलांना हक्क अधिकार मिळवून दिले

महात्मा ज्योतिबा फुले यांनी तत्कालीन इंग्रजांचे राजपुत्र पुण्यात आले असताना त्यांना भेटण्यासाठी महात्मा फुले शेतकऱ्यांच्या पेहरावात कार्यक्रमाला जाऊन शेतकऱ्यांच्या व्यथा इंग्रज दरबारी मांडल्या अशी ते शेतकऱ्यांची नेते होते म्हणून त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ सुद्धा लिहिला होता व त्यांचे शिष्य बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांसाठी १९५४ साली फार मोठा मोर्चा काढून त्यांच्या समस्याना वाचा फोडण्याचे काम केले होते तसेच कोकणातील शेतकऱ्यांसाठी खोती पद्धती बंद करण्यासाठी ही मोर्चे काढले होते परंतु आज काल शेतकऱ्यांच्या नावाने अनेक नेते मंडळी काम करतात व स्वार्थ साधून घेतात परंतु खरे शेतकऱ्यांचे नेते हे महात्मा ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेच होते असेही प्रा. बागुल यांनी सांगितले याप्रसंगी अविनाश बनसोडे, रूपचंद कांबळे, चंद्रमणी डोंगरे, विजय पोळ, नगरसेवक सदानंद भैया प्रधान नगरसेवक रफिक भैया दीपक टाकणखार पत्रकार किशन भदर्गे पत्रकार प्रा. सुदर्शन स्वामी, शिक्षक नेते राजकुमार सोनवणे सर,राजेश पोटभरे अशोक डोंगरे लक्ष्मण पोटभरे सर अशोक मगर दिनेश निसर्गंध, अतुल भैय्या भदर्गे विनय पोटभरे राजू कांबळे यांच्यासह जय भीम नगर फुले आंबेडकर जयंती महोत्सव समिती व सर्व समाज बांधव उपस्थित होते

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी फास्ट ट्रॅक मदत ; राज्य सरकारचा मोठा निर्णय

मुंबई : शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदत मिळण्यात होणारा विलंब आता टळणार आहे. सरकारने जिल्हा आणि तालुका स्तरावर नव्या समित्या स्थापन करून मदत प्रक्रिया 'फास्ट ट्रॅक'वर आणली आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत मिळावी यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

मदत प्रक्रियेत होणारा विलंब टाळण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची पुनर्रचना करण्यात आली असून, आता तालुकास्तरावरही स्वतंत्र समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महसूल व वन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. यापूर्वी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत मिळण्यात प्रशासकीय अडथळ्यांमुळे मोठा विलंब होत असल्याचे दिसून आले होते.



यावर उपाय म्हणून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीत नवीन सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच, स्थानिक पातळीवर प्रकरणांचा जलद निपटारा व्हावा यासाठी तालुकास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना समित्यांचे गठन करून त्याचा अहवाल तातडीने शासनाला सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच प्रलंबित आणि नवीन प्रकरणांचा जलद निपटारा करून त्याबाबतचा अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तालुकास्तरीय समिती उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कार्य करेल. तहसीलदार सदस्य सचिव असतील. यामध्ये गटविकास अधिकारी, पोलिस निरीक्षक, आरोग्य अधिकारी, सहायक निबंधक, बँक प्रतिनिधी तसेच शेतकरी व सामाजिक संस्था प्रतिनिधींचा समावेश असेल. या नव्या यंत्रणेमुळे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदत मिळण्याची प्रक्रिया अधिक वेगवान होणार असून, तातडीने आर्थिक सहाय्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे बाधित कुटुंबांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कुटुंबांना तातडीने भेट देण्याचे निर्देश

शेतकरी आत्महत्या प्रकरणाची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी (एसडीओ) व तहसीलदार संबंधित कुटुंबीयांची तात्काळ भेट घेणार आहेत. घटनेची कारणे जाणून घेऊन त्वरित प्रस्ताव तयार करून पुढील प्रक्रिया गतीने पूर्ण केली जाणार आहे.

जिल्हास्तरीय समितीची रचना

जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतील, तर मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. यामध्ये जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, कृषी अधिकारी, बँक प्रतिनिधी, महिला व बालविकास अधिकारी, समाजकल्याण अधिकारी तसेच शेतकरी व सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी सहभागी असतील.

## केळीतील कंद पोखरणाऱ्या सोंड किडीचे नियंत्रण

केळीमध्ये कंद पोखरणाऱ्या सोंड किडीमुळे (कॉस्मोपॉलिटस सॉर्डिकस) झाडे कोलमडून पडून झाडांची संख्या कमी होते. या भुंग्याची अळी कंदामध्ये राहून केळीचे कंद पोखरून आतील भाग खाते. कंदामध्ये पोखरत उभे-आडवे बोगदे तयार करते. त्यामुळे कंदातील उती कुजतात व कंद सडतो. या बोगद्यांचे प्रमाण वाढल्यास मुळांपासून मिळणारे अन्नद्रव्य मिळण्यात अडचणी येतात. केळीचा जोम कमी होऊन झाड मरते. किंवा जमिनीच्या पृष्ठभागापासून कोलमडून पडते.



नियंत्रण करण्याचे उपाय : शेतातील धसकटे व इतर पालापाचोळा वेचून जाळून टाकावा किंवा जमिनीत गाडून टाकून शेत स्वच्छ करून घ्यावे. लागवडीसाठी निरोगी, कीडमुक्त कंदाची निवड करावी. कंद स्वच्छ पाण्याने धुऊन क्लोरपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) २५ मिली + कार्बन्डाझीम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लागवड करावी.

निबोळी पेंड ५०० ग्रॅम प्रतिझाड या प्रमाणात जमिनीत मिसळून घ्यावे. कार्बोफ्युरानची २० ग्रॅम भुकटी प्रतिझाड तिसऱ्या, पाचव्या व सातव्या महिन्यात जमिनीत मिसळून द्यावी.

सापळा : प्रौढ भुंगेरे व अळ्यांना आकर्षित करण्यासाठी काढणी झालेल्या झाडाच्या ताज्या कापलेल्या खुंटावर कंदाची तबकडी वा खोडाचा तुकडा ठेवावा. दोन दिवसांनंतर हे सापळे त्यात जमा झालेल्या भुंगेऱ्यांसहित नष्ट करावेत. सर्वेक्षणासाठी ३० सें.मी. आकाराच्या बुंध्यांचे सापळे १० ते १५ प्रति एकरी या प्रमाणात वापर करावा. कंद पोखरणाऱ्या भुंग्याचा अधिक प्रादुर्भाव असल्यास सापळ्यांचे प्रमाण वाढवावे. जैविक कीड नियंत्रणासाठी बिव्हेरिया बॅसियाना या बुरशीचा किंवा हेटेकोहयाबिटीस इंडिका या सूत्रकृमीचा प्रतिसापळ्यावर २० ग्रॅम या प्रमाणात वापर करावा. हे सापळे झाडांच्या बुडाशी जमिनीवर ठेवावेत. कासमिल्यूर वापरलेल्या कामगंध सापळ्याचा प्रतिहेक्टरी ५ या प्रमाणात वापर करावा. या कामगंध सापळ्याची जागा प्रत्येक महिन्यात बदलावी. या किडीचा बागेत अधिक प्रादुर्भाव असल्यास खोडवा पीक टाळावे. तसेच प्रादुर्भाव कमी प्रमाणात असल्यास खोडवा पीक घेताना पूर्वीच्या कापलेल्या बुंध्यांवर क्लोरपायरीफॉम २५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वापर करावा.

केळीच्या घडावर किती फण्या ठेवाव्यात : झाडाच्या बुंधा/ पेंधा चा खालून गुठलीच्या वर घेर मोजणे( इंचामध्ये).म्हणजे जमिनीपासून साधारण ५ -७ सेमी उंचीवर किती इंचाचा घेर/जाडी आहे, त्याला ४ ने भाग घ्यायचा, जेवढे उत्तर येईल तेवढया फण्या ठेवाव्यात.उदा. बुंध्याचा घेर= ४ इंच असेल तर ४ ४= १ फण्या ठेवणे.याप्रमाणे बारीक झाड २४ इंचाचे असेल तर ६ फण्या ठेवाव्यात.

## जनावरांचे आजार ओळखण्यासाठी बाह्य निरीक्षण महत्वाचे

भारतामध्ये शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन व्यवसाय केला जातो. परंतु कोणत्याही व्यवसायाप्रमाणे पशुपालन व्यवसायामध्ये देखील समस्या असतातच. गाय आणि म्हशी सारख्या जनावरांना होणारे आजार एक प्रमुख समस्या असते. परंतु जनावरांचे बारकाईने निरीक्षण केल्यास या निरीक्षणावरून जनावरांना कोणत्या प्रकारचा आजार झाला आहे याचा ढोबळ मानाने अंदाज बांधता येतो व या पद्धतीने उपचार देखील करता येतात व होणाऱ्या नुकसानीपासून वाचता येते.

असे करा जनावरांचे बाह्य निरीक्षण : जनावरांची कासेचे निरीक्षण करताना ती सर्वसाधारण आहे का? कासेवर सूज आलेली आहे का? याचे निरीक्षण करावे जेणेकरून कासदाह यावर तात्काळ उपचार करणे शक्य होते. तसेच कासेच्या कमी होणार या आकाराकडे ही लक्ष ठेवावे. जेणेकरून कोणत्यातरी घटकाची कमतरता असल्यामुळे किंवा कासेचा आजार लक्षात येऊन दूध उत्पादनात होणारी घट राहता येते. जनावरांच्या शेपटीचे निरीक्षण करताना शेपटी वरचे केस कमी होत आहेतका? किंवा शेपटीच्या गोंड्याचे पूर्ण केस गेले आहेत का? याचे व्यवस्थित निरीक्षण करावे. यावरून शेपटीला जंतुसंसर्ग, सरड्या या रोगाचे योग्य निदान करून उपचार करणे शक्य होते. जनावरांचे निरीक्षण करताना जनावरांच्या शरीरावर कुठे सूज आहे का? उदाहरणार्थ पुढच्या दोन्ही पायांच्या मध्ये,जबड्याच्या इत्यादी ठिकाणी पहावे.यावरून दोन्ही पायांच्या मध्ये सूज असल्यास पोटात गेलेली अखाद्य वस्तू, जबडे खाली सूज वरून घटसर्प,जंत प्रादुर्भाव याचे निदान करता येते. दोन्ही डोळ्यांचे निरीक्षण करताना डोळे पाणीदार, टवटवीत आहेत का? डोळ्यातून स्त्राव किंवाघाणयेत आहे का? याची व्यवस्थित निरीक्षण करावे तसेच डोळे पांढरे, निळे झाले आहेत का?



त्याची व्यवस्थित निरीक्षण करावे. या निरीक्षणावरून डोळ्याला लागलेला मार लक्षात येऊन वेळीच उपचार होतात. बऱ्याच वेळा इतर आजारांमुळे देखील जनावरांच्या डोळ्यातून पाणी येताना दिसते. तसेच जनावरांच्या नाकपुडी चे निरीक्षण करतानानाकपुडी जर कोरडी असेल तर जनावर आजारी आहे हे समजावे. नाकपुडी जर पाणीदार असेल तर जनावरे निरोगी असल्याचे दर्शवते. जनावरांच्या तोंडामधून सतत लाळ गळत असेल तर जनावरांच्या तोंडामध्ये जखम किंवा लाळ खुरकूत रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे हे समजावे. तसेच इतर लक्षणांची सांगड घालून त्याचे योग्य निदान होऊ शकते. बऱ्याच गाई किंवा म्हशीजर शिंगे गोठ्यामध्ये गव्हाणी,भिंतीवर आदळतात. यावरून एक तर कानाच्या मधल्या भागाला सूज येऊन कानात पू तयार झाला आहे किंवा शिंगांचा कॅन्सरही असण्याची शक्यता असते. काही जनावरे सतत दात खाताना त्यांचा आवाज येतो किंवा कण्हण्याचा आवाज येतो. तेव्हा अशा जनावरांमध्ये एकतर पोटशूळ किंवा इतर आजार असण्याची शक्यता असते. म्हशीच्या अंगावर कधीकधी काळ्या कातडीवर पांढरे ठिपके दिसतात.कालांतराने या ठिपक्यांचा आकार हळूहळू वाढत जातो.अशा वेळी समजावे की कॉपर च्या कमतरतेमुळे हे पांढरे ठिपके दिसून येत आहे. अशावेळी पशुतज्ज्ञांकडून वेळेस उपचार करून घ्यावे.

## एरोपोनिक फार्मिंग तंत्राने छतावर उगवा बटाटे, कमी वेळेत अधिक उत्पादन!

देशातील बहुतेक शेतकरी आता पारंपरिक पद्धतीऐवजी एरोपोनिक पद्धतीने शेती करत आहेत आणि त्यात ते यशस्वीही होत आहेत. शेतकरी एरोपोनिक पद्धतीचा वापर करून हवेत बटाट्याची लागवड करत त्यातून चक्क १० पट अधिक उत्पन्न मिळत आहे. भारतातील ७५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. काळानुसार शेतीच्या पद्धतीही बदलू लागल्या आहेत. शेती सुधारण्यासाठी नवनवीन शोध लावले जात आहेत. यामुळे भारतीय शेतकरी आता तंत्रज्ञानाच्या बाबतीत युरोप, अमेरिकेसारख्या प्रगत देशांशी स्पर्धा करू लागले आहेत. देशातील बहुतांश शेतकरी आता पारंपरिक पद्धतीऐवजी एरोपोनिक पद्धतीने शेती करत आहेत आणि त्यात ते यशस्वीही होत आहेत. शेतकरी एरोपोनिक पद्धतीचा वापर करून हवेत बटाट्याची लागवड करत असून त्यातून १० पट उत्पन्न मिळत आहे.

एरोपोनिक शेती म्हणजे काय? एरोपोनिक तंत्रज्ञान अशी पद्धत आहे ज्यासाठी शेतकऱ्याला माती आणि जमिनीची गरज नसते. शेतकरी बटाट्याला त्यांच्या लटकलेल्या मुळांपासून पोषण देतात. घराच्या छतावरच एरोपोनिक पद्धतीने शेती करता येते. या तंत्रात, लटकलेल्या मुळांवर पोषक द्रव्ये फवारली जातात आणि झाडाचा वरचा भाग मोकळ्या हवेत आणि प्रकाशात राहतो. जेव्हा एरोपोनिक पद्धतीने बटाट्याची लागवड केली जाते तेव्हा पहिले पीक येण्यासाठी ७० ते ८० दिवस लागतात. या पद्धतीने शेती करणे शेतकऱ्यांना खूप फायदेशीर ठरू शकते, कारण कमी खर्चात आणि कमी जागेत शेती करून शेतकरी बटाट्याचे चांगले उत्पन्न मिळवू शकतात. अधिक पीक उत्पादनामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढते.



एरोपोनिक सिस्टम खर्च : एरोपोनिक फार्मिंग सिस्टीम बसवणे शेतकऱ्यांना सुरुवातीला महाग वाटेल, पण एकदा ते बसवल्यानंतर ते सहजासहजी मोठी कमाई करू शकतात. बटाटा तंत्रज्ञान केंद्राच्या मते, शेतकरी एरोपोनिक पद्धतीने बटाट्याची लागवड करून खूप चांगल्या दर्जाचे उत्पादन घेतात. याशिवाय बटाट्याची झाडेही वेगाने वाढतात आणि त्यांना कमी पाणी लागते.

एरोपोनिक शेती कशी करावी? एरोपोनिक फार्मिंग पद्धतीने आधुनिक आणि वैज्ञानिक अशा दोन्ही प्रकारे शेती करता येते. या तंत्राने शेती करण्यासाठी, शेतकऱ्यांना प्रथम बटाट्याचे सुधारित वाण निवडावे लागते आणि त्याची रोपे रोपवाटिकेत तयार केली जातात. यानंतर ही रोपे बागकाम युनिटमध्ये न्यावे लागेल. आता तयार केलेल्या बटाट्याच्या रोपाची मुळे बावस्टीनमध्ये बुडवली जातात, ज्यामुळे बुरशीचा धोका कमी होतो. यानंतर, शेतकऱ्यांना बेड तयार करावा लागतो, त्यानंतर रोपे लावली जातात. जेव्हा बटाट्याची झाडे १० ते १५ दिवसांची असतात, तेव्हा बटाट्याची रोपे एरोपोनिक युनिटमध्ये लावली जातात. या पद्धतीमुळे बटाटा पिकापासून कमी वेळेत जास्त उत्पादन मिळते.

एरोपोनिक पद्धतीने बटाट्याची शेती करण्याचे फायदे : या पद्धतीने शेती केल्यास शेतकरी पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत बटाट्याचे १० पट अधिक उत्पादन घेऊ शकतात. एरोपोनिक शेती पद्धतीचा वापर करून शेती केल्याने शेतकर्यांचे उत्पन्नही १० पटीने वाढते. या तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकरी आपल्या घराच्या गच्चीवरही बटाट्याची लागवड करू शकतात. या तंत्राचा वापर करून लागवडीसाठी, नर्सरीमध्ये बटाट्याची रोपे तयार केली जातात आणि ही रोपे एरोपोनिक युनिटमध्ये लावली जातात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६१ : प्रिन्स सेसी या शास्त्रज्ञाने प्रथमच दुर्बिणीसाठी टेलिस्कोप ही संज्ञा वापरली.
१६६५ : सुप्रसिद्ध पुरंदरच्या वेढ्यामधे दिलेरखान पठाणने वज्रमाळ किल्ला जिंकला.
१७३६ : चिमाजीअप्पांनी मोघल बादशहाचा हस्तक जंजिरा येथील सिद्दीसाताचा पराभव करुन मराठी सत्तेचा दरारा बसविला.
१८६५ : जॉन विल्कस बूथने अब्राहम लिंकनवर गोळी झाडली. लिंकन दुसर्या दिवशी मृत्यू पावला.
१९१२ : आर.एम.एस. टायटॅनिकची हिमनगाशी टक्कर. बोटीला भगदाड पडून बुडु लागली.
१९४४ : मुंबईच्या बंदरात उभ्या असलेल्या बोटीवर महाभयानक विस्फोट. ३०० ठार. त्याकाळच्या २ कोटी पाउंडचे नुकसान.
१९४४ : मुंबई गोदीत उभ्या असलेल्या 'फोर्ट स्टिकिन' या मालवाहू जहाजावर दुपारी ४ वाजुन ५ मिनिटांनी भीषण स्फोट होऊन ३०० जण ठार झाले आणि (त्याकाळच्या) सुमारे २ कोटि पौंडा इतके आर्थिक नुकसान झाले.
१९८६ : बांगलादेशमध्ये १ किलो वजनाच्या अतिप्रचंड गारांचा वर्षाव. ९२ ठार. गारांच्या वजनाचा हा विक्रम अजुन अबाधित आहे.
१९९५ : टेबल टेनिसमधे सलग ६,६७० रॅलीज करण्याचा जागतिक विक्रम डॉ. रमेश बाबू यांनी पुण्यात नोंदवला.
२००८ : भारतातील कोलकत्ता व बांगलादेशाची राजधानी ढाका या दोन देशादरम्यान रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.
२०१० : पश्चिम बंगाल, उडीसा, झारखंड आणि बिहार राज्यात आलेल्या चक्रवर्ती वादळामुळे सुमारे १२३ लोकांचे निधन झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२९ : क्रिस्टियन हायगेन्स डच गणितज्ञ, खगोलविद्? आणि पदार्थवैज्ञानिक, लंबकाच्या घड्याळाचा शोध (मृत्यू: ८ जुलै १६९५)
१६७५ : छत्रपती शिवाजी महाराज यांचे धाकटे पुत्र छत्रपती राजाराम भोसले यांच्या दुसऱ्या पत्नी राणी ताराबाई भोसले यांचा जन्मदिन.
१८३३ : व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता रॉस लोव्हिस मंगल्स व्हीसी यांचा जन्मदिन.
१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे खंदे नेते, अस्पृश्य समजल्या जाणार्या जातितील पहिले मॅट्रिक व पहिले पदवीधर, इंग्लंडमध्ये वकिलीतील बॅरिस्टरची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. (मृत्यू: ६ डिसेंबर १९५६)
१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार.
१८९८ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारमधील प्रसिद्धी व प्रचार प्रमुख सुब्बीर अप्पादुराई यांचा जन्मदिन.
१९०७ : भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रारंभिक नेते व माजी सरचिटणीस पूरणचंद जोशी यांचा जन्मदिन.
१९१४ : शांता हुबळीकर अभिनेत्री (मृत्यू: १७ जुलै १९९२)
१९१९ : शमशाद बेगम पार्श्वगायिका (मृत्यू: २३ एप्रिल २०१३)
१९२२ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९६९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (मृत्यू: १८ जून २००९ सॅन अन्सेल्मो, कॅलिफोर्निया, यू. एस. ए.)
१९२७ : द. मा. मिरासदार विनोदी लेखक (मृत्यू: )
१९३३ : सर्जनशील कला अकादमीचे संस्थापक-प्राचार्य अनिल कुमार दत्ता यांचा जन्मदिन.
१९४२ : मार्गारेट अल्वा केंद्रीय मंत्री व राजस्थानच्या राज्यपाल
१९४३ : रामदास फुटाणे वात्रटिकाकार
१९५७ : भारतीय मल्याळम स्त्रीवादी लेखिका आणि नाटककार के. सरस्वती अम्मा यांचा जन्मदिन.
१९५७ : भारतीय अवकाश वैज्ञानिक आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष तसचं, विक्रम साराभाई स्पेस सेंटर आणि लिक्विड प्रोपल्शन सिस्टम सेंटरचे माजी संचालक कैलासावादिव शिवन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५० : भारतीय तत्त्ववेत्ते योगी रमण महर्षी तथा वेंकटरमण अय्यर समाधिस्थ झाले. चैत्र व. १२ शके १७८३ (जन्म: ३० डिसेंबर १८७९)
१९६२ : सर मोक्षगुंडम्? विश्वेश्वरैया, भारतीय अभियंता.
१९६२ : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियंते, विद्वान, मुत्सद्दी आणि मैसूर संस्थानचे दिवाण
१९६३ : केदारनाथ पांडे तथा राहूल सांकृतायन इतिहासकार (जन्म: ९ एप्रिल १८९३)
१९९७ : चंदू पारखी चित्रपट आणि नाट्य अभिनेते (जन्म:)
१९९८ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, छायाचित्रकार व पटकथालेखक नितीन बोस यांचे निधन.
२०१३ : राम प्रसाद गोएंका उद्योगपती (जन्म: १ मार्च १९३०)

## हळद, मिरची आणि मसाला पिकांसाठी अनुदान; वाचा संपूर्ण प्रक्रिया

मसाला पिकाखालील क्षेत्रामध्ये वाढ करणे, ग्रामीण भागामध्ये रोजगाराची निर्मिती याचबरोबर मसाला पिकांवर प्रक्रिया, निर्यातक्षम मसाला पिकाचे उत्पादन वाढवणे यासारखे उद्दिष्ट ठेऊन ही योजना राबवली जात आहे. हे शेतकरी आहेत पात्र : किमान स्वतःची वीस गुंठे जमीन असणे आवश्यक. मसाला पिकाची पूर्णपणे नव्याने लागवड करणाऱ्या शेतकऱ्याला प्राधान्य. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दोन हेक्टर मर्यादेमध्ये अनुदान. जर एखाद्या शेतकऱ्याने गेल्या पाच वर्षांमध्ये योजनेचा लाभ घेतला असेल आणि तो दोन हेक्टरचा असेल तर त्या शेतकऱ्याला नव्याने लाभ दिला जाणार नाही. मात्र त्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रावर ती लागवड केलेली असेल तर त्या शेतकऱ्याला उर्वरित क्षेत्रासाठी लाभ दिला जातो. पुढील पाच वर्षापर्यंत एकदा लाभ घेतल्यानंतर या योजनेअंतर्गत लाभ दिला जात नाही.लागवडीला एवढे अनुदान दिले जाते : या योजनेअंतर्गत एकूण ५० हजार रुपये प्रति हेक्टर अनुदान निश्चित. सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४० टक्के अर्थात प्रति हेक्टर २० हजार रुपये तर अनुसूचित क्षेत्रासाठी ५० टक्के अर्थात २५ हजार रुपयापर्यंत अनुदान.हळद आणि आले : कंदवर्गीय मसाला पिकांच्या लागवडीसाठी ५० टक्क्यांपर्यंत किंवा प्रति हेक्टरी कमाल ४० हजार रुपये ते ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान.


राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत




# फेरफार नोंदी, सातबारा बाबत सजग राहावे-पापळकर

## समाधान शिबिरात ६०० ग्रामस्थांना दिलासा!

जालना । प्रतिनिधी

महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वृद्धांसाठी साठी सजग राहणे गरजेचे आहे. ॲग्रो स्टॅक व विविध योजनांचा वेळेतच फायदा घ्यावा. शेतकरी २० ते २५ वर्षांनंतर ही फेरफार नोंदी, सातबारा तपासात नसल्याने नंतर होणारा त्रास टाळण्यासाठी सजग राहावे असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले.

जालना तहसील कार्यालयाचे वतीने वाघ्रुळ जहांगीर मंडळात छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर शुक्रवारी ( ता.१० ) जगदंबा देवी मंदिर संस्थान येथे संपन्न झाले. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, शिवाजी अधिकारी रामदास दौंड, तहसीलदार छाया पवार, नायब तहसीलदार शैलेश राजमाने, राजू निहाळ ,मनीषा घागरमाळे, मंडळ



अधिकारी धनेश,अंभोरे,पडूळ,कोळगीर आदी ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी शिबिराचे नियोजन केले. माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, नगरसेवक भास्करराव पाटील दानवे, सिध्दीविनायक मुळे, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा जगदंबा देवी मंदिर संस्थानचे अध्यक्ष आदींची यावेळी उपस्थिती होती.

सदरील शिबिरात ३७२ शेतकऱ्यांना सातबारा दुरुस्त, जिवंत सातबारा व विविध योजना अंतर्गत सातबारा आठ वितरित करण्यात आले.१३ शेतकऱ्यांना मोफत वाळू पास , संजय गांधी निराधार योजनेची १३८ प्रकरणी निकाली काढण्यात आली. नॉन क्रिमिलियर ( ९२ ), उत्पन्नाचे प्रमाणपत्र (१२७), राष्ट्रीयत्वाची ०३ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. ०७ शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर शेत रस्ते पाणंद रस्त्याची नोंद घेतली.

सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी यांनी केले तर सरपंच यांनी आभार मानले. यावेळी पंचक्रोशीतील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी यावेळी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रशासनातील विविध विभाग आपल्या दारापर्यंत आले आहेत. ग्रामस्थांनी शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घेतला पाहिजे असे नमूद केले.

# धमकी देऊन विवाहित महिलेवर अत्याचार ;एक आरोपी अटकेत, दुसरा फरार

मंठा । प्रतिनिधी

मंठा शहरात एका गंभीर आणि संतापजनक घटनेत एका विवाहित महिलेवर धमकावून जबरदस्तीने शारीरिक संबंध केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी मंठा पोलिस ठाण्यात दत्ता घुगे व अमोल खंडागळे या दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे, तर दुसरा आरोपी फरार आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि. २७ जुलै २०२५ रोजी सुमित निंबाळकर यांच्या घरी घडली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, दत्ताराव बाजीराव घुगे याने पिडीत फिर्यादी महिलेची ओळख करून घेत तिचा मोबाईल नंबर मिळवला. त्यानंतर त्याने वारंवार फोन व संदेश पाठवून तिला त्रास देण्यास सुरुवात केली. आरोपीने महिलेवर दबाव टाकत, ''तू मला भेटली नाहीस किंवा माझ्याशी संपर्क ठेवला नाहीस, तर तुझ्या नवऱ्याला तुझे इतरांशी संबंध असल्याचे खोटे सांगेल, तसेच तुझ्या मुलाचे अपहरण करेल,'' अशी गंभीर धमकी दिली तसेच महिलेच्या घरात घुसून आरोपीने तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक संबंध केल्याचा आरोप आहे. दरम्यान, आरोपी क्रमांक २ अमोल खंडागळे (रा. मंठा) याने फिर्यादीचा पाठलाग करून तिची माहिती आरोपी क्रमांक १ ला पुरवून या गुन्ह्यात सहकार्य केल्याचे तपासात समोर आले आहे.

या घटनेनंतर पीडित महिलेने तक्रार दाखल केल्यानंतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास मंठा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत एका आरोपीला अटक केली असून दुसरा आरोपी फरार आहे. फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके कार्यरत आहेत.या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून महिलांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## || थोडक्यात

### सरसम – हिमायतनगर मार्गावर अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक

नांदेड । प्रतिनिधी

सरसम – हिमायतनगर मार्गावरील म्हसोबा नाल्याजवळ शुक्रवारी रात्री झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे गावावर शोककळा पसरली आहे. विशेष म्हणजे मृत दोघे आपल्या आई-वडिलांना एकुलते एक होते. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी कुटुंबीयांचा आक्रोश पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू आले.

मिळालेल्या माहितीनुसार, सरसम येथील रमेश गुंडेकर, अविनाश गोखले आणि लखन पंड्या हे तिघे शुक्रवारी रात्री हिमायतनगरहून मोटरसायकलने सरसमकडे निघाले होते. त्याचवेळी भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात लखन पंड्या यांचा जागीच मृत्यू झाला, तर रमेश गुंडेकर आणि अविनाश गोखले हे गंभीर जखमी झाले. जखमींना तत्काळ नांदेड येथे उपचारासाठी हलविण्यात येत असताना भोकरजवळ पोहोचण्यापूर्वीच अविनाश गोखले यांचा मृत्यू झाला. रमेश गुंडेकर यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत. या घटनेमुळे सरसमहिमायतनगर मार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, हिमायतनगर तालुक्यात वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अपघात रोखण्यासाठी रस्त्यांवर आवश्यक त्या ठिकाणी स्पीड ब्रेकर, सूचना फलक आणि पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणी होत आहे. मृत अविनाश गोखले यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्यावर शनिवारी दुपारी सरसम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मुलाच्या अकाली मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबीयांनी हंबरडा फोडला. लखन पंड्या यांच्या पश्चात आई-वडील आणि पत्नी असा परिवार असून तेही आई-वडिलांचे एकुलते एक पुत्र होते. दोन्ही मृतदेहावर सरसम येथे एकाच ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले. या दुर्दैवी घटनेमुळे दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### हरभरा खरेदीची मर्यादा वाढविण्याच्या सूचना नाफेडला द्या

परभणी। प्रतिनिधी

नाफेडमार्फत हरभरा खरेदीची मर्यादा हेक्टरी १४ क्विंटल वरून २५ क्विंटल करण्याची सूचना नाफेडला द्यावी अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व शेतकरी सुकाणू समितीच्या वतीने परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्याकडे करण्यात आली.भाकपचे जिल्हा कमिटी सदस्य लिंबाजी कचरे व मानवत तालुका शेतकरी सुकाणू समितीचे अध्यक्ष बालासाहेब आळणे यांनी याबाबत निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी रब्बी हंगामात हरभरा पिकासाठी वातावरण अनुकूल असल्याने शेतकऱ्यांना हरभरा पिकाचे उत्पन्न एकरी १० ते १२ क्विटल पर्यंत आलेले आहे. परंतू नाफेड मार्फत शेतकऱ्यांचा हरभरा हेक्टरी १४ क्विटल खरेदीची मर्यादा लावल्याने शेतकऱ्यांना राहिलेला हरभरा खाजगी व्यापाऱ्यांना बे-भाव विकावा लागत आहे. नाफेडमार्फत शेतकऱ्यांचा हरभरा ५८२५ रु. प्रती क्विंटल प्रमाणे खरेदी केला जातो. परंतु तोच उर्वरित हरभरा शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांना सरासरी ४,९०० रुपया प्रमाणे विकावा लागत आहे. सरासरी शेतकऱ्यांची प्रति क्विटल ९७५ रुपये ऐवढे नुकसान होत आहे. ही बाब शेतकऱ्यांना परवडनारी नाही. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी सदरील आदेश द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.




# समाजसुधारक महात्मा फुले यांची राष्ट्रवादी कार्यालयात जयंती साजरी



जालना । प्रतिनिधी


समाज सुधारक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयात साजरी करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंदराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समाज सुधारक महात्मा फुले यांचे विचार मांडले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चितेकर,महिला प्रदेश सरचिटणीस वंदना खांडेभराड , मिर्झा अनवर बेग , कामगार आघाडीचे मराठवाडा कार्याध्यक्ष सतीश वाहुळे , सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे, ज्येष्ठ कार्यकर्ते गणेश कावळे, महिला शहराध्यक्ष रिंकल तायड , युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, शहर युवक अध्यक्ष प्रवीण शिंदे,जालना तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे , युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष उमेश मोहिते, जिल्हा कार्याध्यक्ष किशोर सवडे, समाधान राठोड ,आर.के. राठोड यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# एकाच घरातून तीन डॉक्टर!

मंठा । प्रतिनिधीफ

हेलस या छोट्याशा गावाने मोठा मानाचा तुरा आपल्या शिरपेचात खोवला आहे. गावातील एकाच कुटुंबातील तीन भावंडांनी वैद्यकीय शिक्षणाची पदवी संपादन करत एक प्रेरणादायी इतिहास घडवला आहे. डॉ. सोनाली खराबे-बोराडे, डॉ. शुभम खराबे आणि डॉ. पूनम खराबे या तिघांचा कॉन्वोकेशन सोहळा एकाच दिवशी पार पडल्याने, तिन्ही भावंडांनी एकाच दिवशी डॉक्टर होण्याचा मान मिळवला आहे. या अभिमानास्पद क्षणामुळे संपूर्ण हेलस गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, गावकऱ्यांकडून या भावंडांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. एकाच महाविद्यालयातून यशाची तिहेरी कमाई या तिघांनीही गुरु मिश्री होमिओपॅथी महाविद्यालयातून बीएचएमएस पदवी संपादन केली आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कुटुंबाच्या भक्कम पाठिंब्यामुळे त्यांनी हे यश गाठले आहे.



डॉ. पूनम खराबे या गावचे माजी सरपंच व पत्रकार पांडुरंग खराबे यांच्या कन्या आहेत. डॉ. सोनाली खराबे-बोराडे व डॉ. शुभम खराबे हे दीपक सीड्सचे संचालक रामेश्वर खराबे यांची मुले आहेत. कुटुंबातील शिक्षणाला दिलेले महत्त्व आणि प्रोत्साहन यामुळेच ही यशोगाथा साकार झाली आहे. नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आदर्श या तिन्ही भावंडांच्या यशामुळे गावातील विद्यार्थ्यांसमोर निर्माण झाला आहे. ग्रामीण भागातही जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर मोठे स्वप्न साकार करता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. डॉक्टर झाल्यानंतर समाजसेवेची भावना व्यक्त करताना तिन्ही भावंडांनी सांगितले की, ''जनसेवा हीच ईश्वर सेवा मानून आम्ही आरोग्य क्षेत्रात रुग्णांची सेवा करू.'' त्यांच्या या उदात्त विचारामुळे त्यांच्या कार्याबद्दल अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत.हेलस गावासाठी अभिमानाचा क्षण ठरलेली ही यशोगाथा, अनेक तरुणांना स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची नवी दिशा देणारी ठरत आहे. एकाच घरातून तीन डॉक्टर ! हेलस गावातील भावंडांची अभिमानास्पद झेप.. कुटुंबाचा ठसा डॉ. पूनम खराबे या गावचे माजी सरपंच व पत्रकार पांडुरंग खराबे यांच्या कन्या आहेत. डॉ. सोनाली खराबे-बोराडे व डॉ. शुभम खराबे हे दीपक सीड्सचे संचालक रामेश्वर खराबे यांची मुले आहेत. कुटुंबातील शिक्षणाला दिलेले महत्त्व आणि प्रोत्साहन यामुळेच ही यशोगाथा साकार झाली आहे

# एसटी प्रवाशांकडून वसूल करणार स्वच्छता कर

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

एसटी महामंडळाने प्रवाशांना बससह बसस्थानक, तेथील स्वच्छतागृह, प्रतीक्षालयांत स्वच्छता उपलब्ध करून देण्यास १५ एप्रिलपासून प्रवाशांकडून स्वच्छता कर वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता प्रवाशांना प्रत्येक तिकिटामागे २ रुपये जादा मोजावे लागणार आहेत. बसस्थानक, स्वच्छतागृहे तसेच बसच्या स्वच्छतेबाबत बोंबाबोंब असताना स्वच्छता कर मात्र वसूल करण्यात येत असल्याने प्रवाशांत नाराजीचा सूर आहे.

राज्यात एसटीची १५१ आगार व ५९८ बसस्थानके आहेत. याची स्वच्छता कंत्राटी कामगारांकडून करवून घेण्यात येत आहे. दरम्यान, स्वच्छतेबाबत तक्रारी वाढल्याने आता स्वच्छतेचे काम कराच्या माध्यमांतून मिळालेल्या पैशांतून दर्जेदार करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्या अनुषंगाने १४ एप्रिलच्या मध्यरात्री पासून मासिक, त्रैमासिक पास धारक व सर्वसामान्य प्रवाशांकडून प्रत्येक तिकिटांसाठी २ रुपये स्वच्छता कर वसूल करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे महार-ाष्ट्र दर्शनसाठी ५ रुपये तर विशेष कामांसाठी बस घेणाऱ्यांना एका बससाठी प्रत्येक दिवस ५० रुपये आकारण्याचे आदेश देण्यात आले आहे. राज्यात दररोज सुमारे ५५ लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात.

शिवशाही असो की इतर बस असो त्यात अस्वच्छता मोठ्या प्रमाणात असते. आरामदाई शिवशाहीत तर मुंग्या आणि झुरळाचा प्रवास असतोच यात सुधारणा करण्याच्या नावाखाली स्वच्छता कराचा बोजा प्रवाशांवर टाकण्यात येत असल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. स्वच्छता करातून विद्यार्थी, अहिल्याबाई होळकर पास, १४ एप्रिलच्या आगोदर तिकीट बुक करणाऱ्यांना, तसेच मानव विकासचे विद्यार्थी यांना स्वच्छता कर वसूल करण्यातून सवलत मिळणार आहे.

# पोलिस अधीक्षक रस्त्यावर; गुंडांची काढली धिंड !

नांदेड। प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांत गैंगवार आणि पाच जणांच्या निघृण हत्येच्या घटनांनी हादरलेल्या नांदेड शहरात आता पोलिसांनी गुन्हेगारांविरुद्ध निर्णायक कारवाई मोहीम हाती घेतली आहे. शिक्षणा पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नांदेडची प्रतिमा क्राईम कॅपिटल अशी होऊ लागल्याने, स्वतः पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार मैदानात उतरले आहेत. खाकीचा धाक निर्माण करण्यासाठी त्यांनी स्वतः दुचाकीवरून रात्र गस्त (पेट्रोलिंग) सुरू केली असून, पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी २५ सराईत गुन्हेगारांची रस्त्यावरून धिंड काढल्याने गुंडांचे धाबे दणाणले आहेत.

नांदेड शहरात बंदुक तलवारी, खंजरसारखा सापडत असलेला घातक शस्त्रसाठा आणि गुन्हेगारी टोळ्यांचे वाढते वर्चस्व पाहता, सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण होते. याची गंभीर दखल घेत पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांनी जिल्ह्यात कोम्बिंग ऑपरेशनचे आदेश दिले. विशेष म्हणजे, अधीक्षकांनी केवळ आदेश न देता स्वतः मध्यरात्री जुना नांदेड, देगलूर नाका, जुना मोंढा आणि पीरबु-हाण नगर यांसारख्या संवेदनशील भागात दुचाकीवर फिरून बंदोबस्ताची पाहणी केली. वरिष्ठ अधिकारीच रस्त्यावर उतरल्याने सुस्तावलेली गस्त यंत्रणाही सतर्क झाली आहे. नांदेड ग्रामीणचे पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी आक्रमक पवित्रा घेत, शहरातील सुमारे २५ सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतले. नागरिकांच्या मनातील भीती घालवण्यासाठी या गुन्हेगारांची ५ किलोमीटरपर्यंत शहराच्या मुख्य रस्त्यांवरून धिंड काढण्यात आली. पोलिसांच्या या ॲक्शनमुळे शहरात ''कायदा मोठा की गुंड?'' या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. गेल्या पाच दिवसांपासून शहरात सुरू असलेल्या कोम्बिंग ऑपरेशन व धडक मोहिमेत मोठ्या प्रमाणात अवैध शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. गंगवारची मालिका सध्या थांबली असली तरी, भविष्यात अशा घटना घडू नयेत, गुन्हेगारांवर खाकीचा वचक रहावा यासाठी ही मोहीम दीर्घकाळ सुरू ठेवण्याची मागणी नागरिक करत आहेत.

# सण उत्सव शांततेत पार पाडणे ही आपली सामुहिक जबाबदारी –पो.नि. पुरुषोत्तम देशमुख

मंठा । प्रतिनिधी

आगामी काळात जयंती उत्सव होणार आहे. हे सर्व उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी तसेच जयंती उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाला सर्वांनी सहकार्य करावे. ही आपली सर्वांचीच सामुहिक जबाबदारी आहे. असे आवाहन पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांनी शांतता समितीच्या बैठकीत केले आहे.

यावेळी मंठा पोलीस ठाण्यात शुक्रवार (ता.१०) रोजी शांतता समितीची बैठक उत्साहात पार पडली.आयोजित बैठकीमध्ये नगराध्यक्ष तसेच बाजार



समिती संचालक वैजनाथ बोराडे , फौजदार संतोष माळगे, विठ्ठल केंद्रे, उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, नगरसेवक राजेश खंदारे, उबेद बागवान, शरद मोरे, प्रकाश घुले, संजय गायकवाड, शिवाजीराव जाधव, मुस्तफा पठाण, शबाब बागवान, नितीन मोरे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना पोलीस निरीक्षक देशमुख म्हणाले की , प्रशासन अधिक गतिमान करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.तसेच, प्रत्येकाने आपल्या वर्तनामुळे इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, असे सांगत त्यांनी वाहतूक नियमांचे महत्त्व स्पष्ट केले. आगामी जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी सोशल मीडियाचा वापर करताना दक्षता बाळगावी, कोणतीही आक्षेपार्ह पोस्ट फॉरवर्ड करू नये, असेही त्यांनी सांगितले. तसेच पोलीस पाटलांनी आपली जबाबदारी पार पाडत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सतर्क राहावे. असे आवाहन केले. याप्रसंगी पत्रकार संघाचे अध्यक्ष नागेश कुलकर्णी, संतोष दायमा, रणजीत बोराडे, जगदीश राठोड, रवी भावसार,अमोल राठोड, गजानन माळकर, सुरेश दवणे यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, नगरसेवक, पोलीस पाटील तसेच जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ | ६

# अहिल्यानगर ते परळी मे पर्यंत धावणार रेल्वे

बीड । प्रतिनिधी

अहिल्यानगर बीड परळी हा बीड जिल्ह्याचा आणि मराठवाड्याचा हिवाळ्याचा प्रश्न आता काहीसा पूर्णत्वाकडे येत आहे अहिल्यानगर ते बीड पर्यंत रेल्वेचे काम पूर्ण झाले असून बीड ते परळी हे मे २०२६ पर्यंत काम पूर्ण होणार असून अहिल्यानगर ते परळी हा रेल्वे मार्ग मे पासून सुरू होण्याची शक्यता रेल्वे विभागाने व्यक्त केली आहे या मार्गावरील सर्व भूसंपादनाचे अडथळे दूर झाले असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे

मराठवाड्याच्या रेल्वे स्वप्नाला गती देणाऱ्या अहिल्यानगर-बीड-परळी या २६१ किमी रेल्वे प्रकल्पाचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ११



एप्रिल रोजी मोजेड ट्रॉलीवरून बीड ते परळी मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा आढावा घेतला. मे २०२६ अखेरपर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून यामुळे अहिल्यानगर ते बीड हा १६७ किमीचा प्रवास साडेचार तासांऐवजी केवळ अडीच तासांत पूर्ण होणार आहे. प्रवासाचा वेळ वाचणार असून परळी तालुक्यातील उन्नत पुलांची कामे वेगाने सुरू आहेत. प्रलंबित भू-संपादनाचे प्रश्न आता मार्गी लागले असून केंद्र आणि राज्य सरकारच्या ५०-५० टक्के खर्चाच्या भागीदारीतून हा प्रकल्प साकारत आहे. स्थानिक व्यापार आणि पर्यटनाला यामुळे मोठी चालना मिळणार असून केवळ धारूर तालुक्यातील देवदहिफळ येथील प्रक्रिया सध्या प्रगतीपथावर आहे. या कामासाठी अनेकांचे योगदान लाभलेले आहेत स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी या रेल्वे मार्गासाठी मोठे प्रयत्न केले त्याकाळी त्यांचे मित्र स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी या मार्गासाठी ५० टक्के निधीचा वाटा राज्य शासनाने उचलला गेला त्यामुळे हा मार्ग आता पूर्णत्वाकडे येत आहे विशेष म्हणजे अहिल्यानगर ते आष्टी पर्यंतचे काम पूर्ण झाले काही काळ डेमो रेल्वे देखील सुरू झाली पुढे राजुरी आणि बीड हे काम देखील पूर्ण झाले त्यानंतर काही महिन्याच्या अवधीमध्ये वडवणी पर्यंत रेल्वे धावू लागली तेथून पुढे परळी पर्यंत रेल्वे मार्गांमधील असलेले अडचणी भूसंपादनाची कामे छोट्या रेल्वे फुलांची कामे हे आता पूर्ण होत आहेत भूसंपादनामध्ये शेतकऱ्यांनी काही ठिकाणी अडकली आणि निर्माण केली होती ती आता दूर झाली असून मे २०२६ पर्यंत बीड ते परळी रेल्वे मार्ग पूर्ण होईल त्यामुळे आता अहिल्यानगर ते परळी ही रेल्वे सेवा मे पासून पुढे सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे ही रेल्वे सेवा सुरू झाल्यात बीड जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल दिसून येतील काही उद्योगधंदे देखील वाढतील विशेषतः अनेक छोट्या व्यवसायिकांना व्यवसाय मिळेल गेल्या अनेक दशकापासून या रेल्वेची वाट पाहणाऱ्या बीड जिल्हा वाशियांचे स्वप्न आता पूर्ण होत असल्याचे दिसत आहे

# बारा कोटी जनतेसाठी मोफत आरोग्यसेवा –डॉ ओमप्रकाश शेटे

बीड । प्रतिनिधी

आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत राज्यातील १२ कोटी ९३ लाख जनतेसाठी मोफत आरोग्यसेवा देण्यात येते विशेषता या योजनेचे राज्याचे अध्यक्ष डॉक्टर ओमप्रकाश शेटे हे सदैव तत्वर असतात कोणत्याही आजारावर रुग्णांना वेळेवर उपचार व्हावे यासाठी हा विभाग तत्पर असतो त्यांच्या या तत्परतेमुळे अनेक रुग्णांना जीवदान मिळाले आहे

एकात्मिक आयुष्मान भारत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली, राज्यभरातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळाव्यात या उद्देशाने आयुष्मान मिशन महाराष्ट्र समिती, महाराष्ट्र राज्य वतीने आरोग्य व्यवस्थेचा व्यापक विस्तार करण्यात आला आहे. सर्वसामान्यांपर्यंत या योजनांचा लाभ सुलभतेने पोहोचावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत ज्या नागरिकांच्या रेशन कार्डवर अद्याप १२ अंकी ऑनलाईन रेशन कार्ड नंबर आलेला नाही, अशा नागरिकांनी तातडीने आपल्या जवळच्या तहसिल कार्यालयात जाऊन तो अपडेट करून घ्यावा. योजनेचा मोफत लाभ मिळवण्यासाठी हा १२ अंकी नंबर असणे अनिवार्य आहे.

रुग्णालयांची संख्या: आता राज्यातील एकूण ४,५३७ नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये हे मोफत उपचार उपलब्ध आहेत. उपचारांची संख्या: एकूण २,३९९ प्रकारच्या गंभीर आजारांवर आणि शस्त्रक्रियांच्या उपचारांचा समावेश आहे.

विमा संरक्षण: प्रति वर्ष, प्रति कुटुंब ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार, ज्येष्ठ नागरिक: ७० वर्षांवरील नागरिकांसाठी अतिरिक्त ५ लाख रुपयांचे (वय वंदना कार्ड) विशेष कवच. अपघात विमा: रस्ते अपघातातील रुग्णास ७ दिवसांपर्यंत १.५० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार. ◀◀ पान ३ वर

# बस व मोटरसायकलच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरापासून जवळच असलेल्या सावरगाव (लो.) जवळ १२ एप्रिल रविवार रोजी एका भरधाव शिवाई बस आणि मोटारसायकल यांच्या जोरदार धडकेत २३ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला.अथर्व महादेव ढगे (रा.धानोरा खुर्द,ता.अंबाजोगाई) असे मृत युवकाचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार,अथर्व ढगे हा आपल्या दुचाकीवरून ( एम एच - ४४,डी- ७४८३) धानोरा (खुर्द) गावाहून अंबाजोगाईच्या दिशेने जात होता. याच वेळी अंबाजोगाईहुन छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी शिवाई बस ( एम एच ४९ बी झेड ९५ ८१) समोरून येत होती. लोखंडी सावरगाव जवळ एका वाहनाला



ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात असताना अथर्वच्या मोटारसायकलची बसला समोरासमोर भीषण धडक बसली असावी असा अंदाज व्यक्त होत आहे. हा अपघात इतका भयानक होता की, यामध्ये मोटारसायकलचा अक्षरशः चक्काचूर झाला.धडक बसल्यानंतर गंभीर मार लागल्याने अथर्वचा जागीच मृत्यू झाला.

अथर्व हा एका अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील असून आपल्या आई - वडिलांचा तो एकुलता एक मुलगा होता. त्याला एक विवाहित बहीण आहे. काळाने त्याच्यावर घाला घातल्याने परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.ओव्हरटेक करण्याच्या नादात अनेकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. सावरगाव (लो.)परिसरात झालेल्या या अपघातामुळे रस्ते सुरक्षेचा आणि वाहन चालवताना घ्यावयाच्या काळजीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पुढील तपास सुरू आहे.

# माजलगावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमीत्त प्रेरणादायी उपक्रमाची सुरूवात

## भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांचा पुढाकार

माजलगाव । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमीत्त पंडित दीनदयाळ उपाध्याय शहर स्वच्छता अभियानाची सुरूवात भाजपा नेते ज्ञानेश्वर नाना मेंडके यांच्या पुढकारातुन आज दि. १२ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आली.

या अभियानाचे नारळ वाढवून विधीवत उद्घाटन भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष केशव



उपाध्ये यांच्या हस्ते करण्यात आले. या अभियाना अंतर्गत शहरातील विवीध ठिकाणी शहर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. यावेळी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्राचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे, जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, अरूण राउत, डॉ. अशोक तिडके, शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी, नगरसेवक दिपक मुंडे, अभय होके, नारायण मेंडके,ज्ञानेश्वर पवार, कैलास खुर्पे, भरत जोशी, रवी गायकवाड, उमेश जाधव, दत्ता जाधव, जक्की इनामदार यांचेसह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला प्रेरीत असा उपक्रम हाती घेत समाज परिवर्तनाच्या विचारांना कृतीत उतरवरत स्वच्छ, सुंदर शहर घडविण्याचा हा स्त्युत्य प्रयत्न असल्याचे उपस्थितांनी सांगीतले.

# कठोर मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मनस्वी मोरे यांची प्रकल्प अधिकारी पदावर निवड

वडवणी । प्रतिनिधी

कु. मनस्वी सुधाकर मोरे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही खचून न जाता जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत महाराष्ट्र शासनाच्या हिंदी महा ऊर्जा (महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट) विभागामध्ये प्रकल्प अधिकारी या पदावर आपले स्थान निश्चित केले आहे.




मनस्वी मोरे यांनी या यशामागे असंख्य दिवस-रात्र मेहनत घेतली. अपयश आले तरी न खचता त्यांनी प्रत्येक वेळी नव्या जोमाने प्रयत्न सुरू ठेवले. अभ्यासात सातत्य, योग्य नियोजन आणि आत्मविश्वास या गुणांच्या बळावर त्यांनी ही उंची गाठली आहे.विशेष म्हणजे, त्यांनी महाराष्ट्र राज्यातून मुलींच्या गटात प्रथम क्रमांक पटकावत राज्यभरात आपली छाप पाडली आहे. त्यांच्या या यशामुळे वडवणी परिसरासह संपूर्ण जिल्ह्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.मनस्वी यांच्या यशामागे कुटुंबीयांचे मोलाचे मार्गदर्शन, शिक्षकांचे सहकार्य आणि स्वतःची अविरत मेहनत हे प्रमुख घटक असल्याचे स्पष्ट होते. आर्थिक व सामाजिक अडचणींवर मात करत त्यांनी आपले ध्येय साध्य केले, हे त्यांच्या जिद्दीचे जिवंत उदाहरण आहे. त्यांच्या या यशामुळे आजच्या तरुण पिढीला परिस्थिती कशीही असो, जर जिद्द आणि मेहनत असेल तर यश नक्की मिळते हा संदेश मिळत आहे.मनस्वी मोरे यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत असून, भविष्यात त्या आणखी मोठे यश संपादन करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# शामराव अण्णा पोकळे यांचे अल्पशा आजारांने निधन

अंमळनेर । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथील रहिवासी असलेले ज्येष्ठ नागरिक शामराव अण्णा पोकळे (नाना ) यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी दि. १०/०४/२०२६ रोजी अहिल्यानगर येथील हॉस्पिटलमध्ये तोंड येण्यावरील उपचार घेत असताना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांची प्राणज्योत मावळली. नानाच्या निधनाने अंमळनेर व पिंपळवंडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे .



ते धार्मिक वृत्तीचे व्यक्तिमत्व होते . अध्यात्मिक , राजकीय,शैक्षणिक, सहकार क्षेत्रात सहभाग असायचा . संपूर्ण परिसर त्यांना नाना नावाने हाक मारायचा . प्रत्येक माणसाच्या सुख-दुःखात सहभागी राहून स्वतःच्या जिद्द आणि चिकाटीच्या जीवावर एक आगळी वेगळी छाप त्यांची असायची . ◀◀ पान ३ वर

# अंकुश नगर येथील युवा कार्यकर्त्यांच्या वतीने महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

अंकुश नगर येथील बौद्ध विहारात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती युवा कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने अत्यंत उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. समाजातील तळागाळातील घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली करणाऱ्या या महापुरुषाला अभिवादन करण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेच्या सामूहिक पूजनाने व पुष्पहार अर्पण करून



झाली. यावेळी युवा कार्यकर्त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध नियोजन करून या अभिवादन सोहळ्याचे आयोजन केले होते. या प्रसंगी जालिंदर माने, बबिता ताई इंगोले, भारत माने, बौद्धाचार्य सोनवणे, दादा कांबळे, ॲड. आदर्श जाधव, अमर माने, आशिष माने, उमेश डोईफोडे, धम्मा डावकर, विशाल डावकर, करण वाघचौरे, यशपाल डावकर यांच्यासह अंकुश नगर मधील सर्व बौद्ध उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या ◀◀ पान ३ वर

# बीडमध्ये ओपन स्पेसचे व्यवस्थापन, कंपाउंड बांधकामासह गायरान जमिनींचे नियोजन करा

## भाजपचे नगरसेवक मनोज घोंगडे यांची बीड न.प. प्रशासनाकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

**शहरातील नागरी सुविधा अधिक सक्षम व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक मनोज घोंगडे यांनी बीड नगरपरिषदेच्या नियोजन व विकास समितीकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनात ओपन स्पेसचे व्यवस्थापन, कंपाउंड बांधकाम तसेच गायरान जमिनींच्या नियोजनाचा समावेश आहे.**

निवेदनात पुढे म्हटले की, शहरातील प्रत्येक वॉर्डमधील ओपन स्पेसची स्वतंत्र नोंद ठेवून त्याची माहिती संबंधित नगरसेवकांना देण्यात यावी. या जागांवर अतिक्रमण होऊ नये यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांच्या हितासाठी या मोकळ्या जागांचा योग्य व नियोजनबद्ध वापर व्हावा, यावर भर देण्यात आला आहे. याशिवाय, शहरातील प्रत्येक ओपन स्पेसभोवती कंपाउंड उभारण्यात यावे, जेणेकरून त्या जागांचे संरक्षण होईल आणि अतिक्रमणाला आळा बसेल. यामुळे शहराच्या नियोजनात शिस्त राहून नागरिकांना सुरक्षित मोकळी जागा उपलब्ध होईल. तसेच, शहरातील गायरान जमिनींवर घरकुलांसाठी भूखंड वाटप करताना प्रक्रिया सुलभ व पारदर्शक ठेवावी. गायरान जमिनींचे वाटप करताना नागरिकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ते सहकार्य करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या तिन्ही मागण्यांची अंमलबजावणी झाल्यास शहरातील नियोजन, पारदर्शकता आणि नागरिकांच्या सोयीसुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, बीड नगरपरिषद प्रशासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. ◀◀ पान ३ वर

# लाखो ठेवीदारांच्या प्रश्नावर जिल्ह्यातील आमदार गप्प का ?

बीड । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेटसह बीड जिल्ह्यातील पाच-सहा मल्टीस्टेट बँका बंद पडल्या. त्यामुळे बीड जिल्ह्यातील लाखो ठेवीदार संकटात सापडले आहेत. विशेष म्हणजे कुटे ग्रुपच्या ज्ञानराधाचे सर्वाधिक ठेवीदार आहेत. ते अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. ५४ ठेवीदारांनी आतापर्यंत आत्महत्या करून जीवन संपविले आहे. सरकारला कधी जाग येणार? माजलगावचे आ.प्रकाशदादा सोळंके यांनी मागील अधिवेशनात ठेवीदारांचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर सरकारने काय केले? ठेवीदारांचे जीवन अत्यंत संकटात सापडले आहे. या लाखो ठेवीदारांचे अडकलेले पैसे मिळवून देणे ही लोकप्रतिनिधी या नात्याने आमदारांचीही जबाबदारी आहे. नुकतेच विधानसभेचे अधिवेशन संपन्न झाले. यात बीड जिल्ह्यातील एकाही आमदाराने सरकारला जाग येण्यासाठी विधानसभेत ठेवीदारांचा प्रश्न उपस्थित केला नाही म्हणून जिल्ह्यातील लाखो ठेवीदार आमदारांवर तीव्र नाराजी व्यक्त करीत आहेत.

ठेवीदारांचे कष्टाचे, घामाचे पैसे, आयुष्यभराची कमाई मल्टीस्टेट पतसंस्थामध्ये आडकल्यामुळे लाखो ठेवीदारांचा उदरनिर्वाह संकटात सापडला असून त्यांची उपासमार होत आहे. ते आपल्या आवश्यक गरजाही भागवू शकत नाहीत. या गंभीर बाबीचे गांभीर्य आमच्या लोकप्रतिनिधींना आहे की नाही? असा प्रश्न ठेवीदारांमध्ये उपस्थित होत आहे. अशा मल्टीस्टेट पतसंस्थावर नियंत्रण का ठेवले नाही? ही सरकारची जबाबदारी आहे. रेवड्या-फुटाणे वाटल्यासारखे नोंदणी परवाने सरकार जनतेची लूट करण्यासाठी वाटले का? राज्य आणि केंद्र सरकार एकमेकावर ढकला-ढकली करीत आहे ही बाब राज्य घटनेला धरून नाही. राज्य सरकारची ◀◀ पान ३ वर

# मराठवाडा विभागात शेकाप विस्ताराची जबाबदारी भाई मोहन गुंड यांच्या खाद्यावर

केज । प्रतिनिधी

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचा मराठवाडा एकेकाळी बालेकिल्ला होता. मराठवाड्याने शेकापला दिग्गज नेते दिले यामध्ये उस्मानाबादचे विरोधी पक्ष नेते, खासदार स्वातंत्र्य सैनानी भाई उध्दवराव पाटील, माजी खासदार भाई ड. नरसिंगराव काटीकर, परभणीचे आमदार भाई अण्णासाहेब गव्हाणे, नांदेडचे माजी खासदार, आमदार भाई डॉ. केशवराव धोंडगे, अहमदपूरचे माजी मंत्री किसनराव देशमुख, परभणीचे माजी खासदार शेषराव देशमुख, तुळजापूरचे माजी आमदार मानिकराव खपले, परभणीचे भाई लक्ष्मणराव नाना गोळेगावकर, कळंबचे माजी आमदार कुंडलिकराव घोडके , निलंग्याचे माजी आमदार भाई श्रीपतराव साळुंके ,औसाचे माजी आमदार भाई मल्लनाथ गुंडनाथआप्पा, कंधारचे माजी आमदार गुरुनाथ कोरडे, गंगाखेडचे माजी आमदार भाई ज्ञानोबा गायकवाड,बीडचे जनार्दन तुपे, परतुरचे भाई माजी बारकुले



या नेत्यांसह शेकडोवर आक्रमक झुंजार कार्यकर्त्यांची स्थानिक पातळीवर काम करणारी शेकापची मोठी फळी मराठवाड्यामध्ये होती. अलीकडच्या काळात भांडवली, जातीय गलिच्छ राजकिय समीकरणात चळवळीपासुन तरूण दुरावत गेले, पक्षाचे मराठवाड्यात बोटावर मोजण्याइतकेच लोक पक्षात उरले आहेत. आशा परिस्थितीत प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक आंदोलनातील चेहरा म्हणून ओळख असणारे शेकापचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांच्यावर दौरे करुन बांधणीची जबाबदारी देण्यात आल्यामुळे मराठवाड्यामध्ये कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे. मराठवाडा विभागातील पक्ष संघटन बांधणीसाठी पुर्ण वेळ काम करणारे भाई मोहन गुंड यांच्यावर जबाबदारी द्यावी अशी मागणी ◀◀ पान ३ वर

# अडीच हेक्टर लिंबोणी बाग जळून खाक

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील जामगाव येथील शेख अतिक शेख रियाज यांच्या शेतातील लिंबोणीच्या बागेमधील महावितरण कंपनीच्या ट्रान्सफॉर्मर मधून जाळ निघाल्याने परिसरातील गवताने पेट घेतला त्यामुळे अडीच हेक्टर क्षेत्रातील फळबाग जळून खाक झाल्याची घटना घडली आहे जामगाव येथील शेख अतिक शेख रियाज यांची सर्वे नंबर २३७ मध्ये तीन हेक्टर जमीन असून त्यापैकी ०२ हेक्टर २० जमिनीवर सन २०१८ मध्ये लिंबोणीची लागवड करण्यात आली होती सन २०२१ पासून उत्पन्न मिळत होते



दिनांक १० एप्रिल रोजी दुपारी महावितरण कंपनीच्या त्यांच्या शेता शेजारील ट्रान्सफर मधून जाळ बाहेर निघाला आणि परिसरातील त्यामध्ये ०२ हेक्टर २० आर या क्षेत्रातील ६०० लिंबोणीची झाडे संपूर्ण जळून खाक झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे

गेल्या वर्षी या लिंबोणीच्या बागेतून ०७ ते ०८ लाख रुपये उत्पन्न मिळाले होते महावितरणच्या दुर्लक्षामुळे माझे मोठे नुकसान झाले आहे नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आहे

-शेख अतिक शेख रियाज

शेतमालक

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुराशी मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ । पान ७

# कोचिंग क्लासच्या ऑफिस बॉयचा काळा कारनामा, आठवीतल्या मुलाला स्टोअर रूममध्ये नेऊन नको ते केलं

पुण्यातील खाजगी कोचिंग क्लासमध्ये आठवीतल्या मुलावर लैंगिक अत्याचार (झींपश उीळाश छश्ुी) झाल्याची संतापजनक घटना घडली आहे. कोचिंग क्लासच्या ऑफिस बॉयने स्टोअर रूममध्ये (झींपश उीळाश छश्ुी) नेऊन या अल्पवयीन मुलाचा लैंगिक छळ केला असल्याची माहिती समोर आली आहे.



पुण्यातील मार्केट यार्ड परिसरात हा कोचिंग क्लास आहे. या घटनेप्रकरणी ऑफिस बॉयला पोलिसांनी अटक केली आहे. विकास गायकवाड असं ३५ वर्षीय ऑफिस बॉयच नाव आहे. मुलाच्या प्रायव्हेट पार्टचे फोटोही ऑफिस बॉयने काढले असल्याचं समोर आलं आहे. या प्रकरणी पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आठवीतला मुलगा मार्केट यार्ड परिसरात असलेल्या कोचिंग क्लासमध्ये शिक्षण घेत होता.

मागील दोन ते तीन वर्षापासून तो याच कोचिंग क्लासमध्ये रोज जायचा. याच दरम्यान ऑफिस बॉयने या आठवीत शिक्षण घेत असलेल्या मुलाला स्टोअर रूममध्ये घेऊन गेला. आणि त्याला अनैसर्गिक स्पर्श करायला सुरुवात केली. मुलाच्या प्रायव्हेट पार्टचे ऑफिस बॉयने फोटो देखील काढले. हा सगळा प्रकार घडल्यानंतर आठवीतला मुलगा घरी जाऊन आई-वडिलांजवळ रडू लागला. क्लासला जायला नकार देत असल्याने वडिलांनी सगळी शहानिशा केली आणि क्लासमध्ये येऊन विचारपूस केली. त्यानंतर मुलानेच हा सगळा प्रकार आई-वडिलांना सांगितला आणि आई-वडिलांनी थेट पोलिसात तक्रार दाखल केली. जानेवारी महिन्यापासून हा सगळा प्रकार सुरू होता. मार्केट यार्ड पोलिसांनी या ऑफिस बॉयवर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर संबंधित कोचिंग क्लासच्या व्यवस्थापनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली होती का, स्टोअर रूमसारख्या ठिकाणी सीसीटीव्ही व्यवस्था होती का, तसेच कर्मचाऱ्यांची पडताळणी योग्य पद्धतीने करण्यात आली होती का, याबाबत पालकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी क्लासमधील इतर कर्मचारी आणि व्यवस्थापनाचीही चौकशी सुरू केली असून, अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कडक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. पोलिसांनी आरोपी विकास गायकवाड याच्यावर पॉक्सो कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा दाखल केला आहे. आरोपीने अशा प्रकारचे कृत्य यापूर्वी इतर कोणासोबत केले आहे का, याचाही तपास सुरू आहे. या घटनेमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शिक्षण संस्थांमधील मुलांच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# जेईई मेन्सच्या दुसऱ्या सत्राचा निकाल २० एप्रिलपर्यंत, परीक्षेची तात्पुरती उत्तरसूची जाहीर

पुणे । प्रतिनिधी

जेईई मेन्सच्या दुसऱ्या सत्रातील परीक्षेची तात्पुरती उत्तरसूची जाहीर केली आहे. एनटीएच्या अधिकृत वेबसाईटला भेट देऊन विद्यार्थ्यांना उत्तरसूची डाऊनलोड करता येणार असून, सोमवारी (दि. १३) रात्री ११.५० पर्यंत आक्षेप नोंदविता येणार आहे. संबंधित परीक्षेचा निकाल २० एप्रिलपर्यंत लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.




एनटीएने देशभरातील विविध परीक्षा केंद्रांवर २ एप्रिल ते ८ एप्रिल यादरम्यान जेईई मेन्स सत्र २ परीक्षा घेतली होती. त्याची उत्तरतालिका आता प्रसिद्ध झाली आहे. उत्तरतालिका डाऊनलोड करण्यासाठी उमेदवारांना त्यांचा अर्ज क्रमांक आणि पासवर्ड टाकावा लागेल. एनटीएच्या अधिकृत अधिसूचनेनुसार, आक्षेप नोंदविण्याची विंडो सुरू केली आहे.

उमेदवार १३ एप्रिल रात्री ११.५० पर्यंत अधिकृत वेबसाईटला भेट देऊन आपले आक्षेप नोंदवू शकतात. सर्व उमेदवारांना अंतिम मुदतीपूर्वी आक्षेप नोंदविण्याचा सल्ला देण्यात येत आहे. त्यानंतर उमेदवारांना दुसरी संधी दिली जाणार नाही. आक्षेप नोंदविण्यासाठी उमेदवारांना प्रत्येक प्रश्नासाठी २०० रुपये आक्षेप शुल्कही भरावे लागेल तसेच सर्व उमेदवारांना निकाल डाऊनलोड करण्यासाठी वेळोवेळी अधिकृत वेबसाईटला भेट देत राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# पुणे मेट्रोचा मास्टर प्लॅन जाहीर! २०३० पर्यंत सर्व मार्गिका पूर्ण होणार; डब्यांच्या संख्येतही मोठी वाढ

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुरू झाल्यानंतर प्रवासी संख्येत वाढ अपेक्षित असल्याने आधीच्या दोन मार्गावरील डबे वाढवणार असल्याचे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. त्यासाठीचा अहवाल मेट्रो तयार करत असल्याचे ते म्हणाले. सध्या पिंपरी चिंचवड ते स्वारगेट, वनाझ ते रामवाडी मेट्रोचा दिवसाला २ लाखांच्या आसपास प्रवासी वापर करत आहेत.



त्यांसाठी सध्या तीन डबे वापरात आहे. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुरू झाल्यावर प्रवासी संख्येत एक ते दीड लाखांची वाढ अपेक्षित आहे. मेट्रोला होणारी गर्दी पाहता विस्तारित मार्गिकांसाठी दोन टप्प्यात १२ आणि १५ गाड्या नव्याने दाखल होतील. सध्यादोन मार्गावर ३४ गाड्या चालू असून त्यांना १०२ डबे आहेत. तिसरा मार्ग आणि टप्पा दोनचा विचार करता अजून २७ गाड्या आणि एकूण ८१ डब्बे असतील.विस्तार, नव्या मार्गिकांचे काम २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे. खडकवासला-खराडी मार्ग नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरून जाणार असून त्यानुसार या रस्त्यावर उड्डाणपूल उभारल्याचे त्यांनी सांगितले. शिवाजीनगर बसस्थानकासंदर्भात महामेट्रो आणि राज्य परिवहनव महामंडळातील कराराचा अंतिम मसुदा तयार झाला असून त्यावर महामंडळाच्या बैठकीत चर्चा होईल.त्याला मान्यता मिळाल्यानंतर एसटी स्थानकासाठी निविदा काढून तेथे एसटी स्थानकासह बस पार्किंग उभारले जाणार आहे. तसेच पीपीपी तत्त्वावर जागेचा विकास करण्यात येणार आहे.

# प्राध्यापकाने स्टँम्प पेपरवर लिहिलं मात्र केलं भयंकर; पुण्यात पीएचडीच्या विद्यार्थिनीचा दुर्देवी शेवट

पुण्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुण्यात बॉटनी विषयात पीएचडी करणाऱ्या एका विद्यार्थिनीने (३० वर्षे) आत्महत्या केली. धक्कादायक बाब म्हणजे या प्रकरणात बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाचा प्राध्यापक असणाऱ्या सहाय्यक संचालक डॉ. ए. बिन्नियमिन (५० वर्षे) याला अटक करण्यात आली आहे.



प्राध्यापकाने विद्यार्थिनीचा विनयभंग केला होता. त्याचा विद्यार्थिनीला मोठा धक्का बसला होता. यातच विद्यार्थिनीने धक्कादायक पाऊल उचलच स्वत:चा जीव घेतला. आत्महत्या करणाऱ्या तीस वर्षीय विद्यार्थिनींच्या वडिलांनी याप्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे. पुण्यातील कोरेगाव पार्कमधून हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या महाविद्यालयातील विद्यार्थिनीने शनिवारी ११ एप्रिल रोजी राहत्या घरी शाहूनगर येथे गळफास घेऊन आत्महत्या केली. संबंधित तरुणी बॉटनी या विषयात बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडिया येथे पीएचडी करीत होती. तर आरोपी बिन्नियमिन तिचा गाईड होता. आत्महत्या करण्यापूर्वी संबंधित विद्यार्थिनीने चिठ्ठी लिहून ठेवली आहे. विद्यार्थिनीने चिठ्ठीमध्ये तिच्यासोबत घडलेला प्रकार सांगितला आहे. ऑगस्ट २०२५ पासून बिन्नियमिन हा अनैतिक प्रकार, गैरवर्तन आणि मानसिक त्रास देत होता.त्याच्या या त्रासाला कंटाळून तरुणीने आत्महत्या केली. दरम्यान, आत्महत्या करण्यापूर्वी दोन दिवस आधी बिन्नियमिन याने स्टॅम्प पेपरवर पुन्हा असा प्रकार करणार नाही. चूक झाली असं लिहून दिलं होतं. परंतु, संबंधित तरुणी या मानसिक धक्क्यातून सावरली नव्हती. त्यामुळे तिने आत्महत्या करीत असल्याचं चिठ्ठीत लिहून ठेवलं आहे. बिन्नियमिन याला अटक केली असून त्याला बुधवार १५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत. पोलीस निरीक्षक भोजराज मिसाळ तपास करीत आहेत.

# बारामतीत अदिती तटकरेंचे भावनिक आवाहन; दादांचे मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न सुनेत्रा ताई पूर्ण करणार

बारामती । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांचे कार्य आणि स्वप्नांची आठवण करून देत राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी भावनिक आवाहन केले. अजितदादा हे केवळ व्यक्ती नसून एक विचार आहेत. त्यांनी पाहिलेली स्वप्ने साकारली; आता त्यांना मुख्यमंत्री म्हणून पाहण्याची वेळ आली होती. ते स्वप्न भविष्यात सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून पूर्ण व्हावे, असे त्यांनी म्हटले.



बारामती येथे आयोजित प्रचार सभेत त्या बोलत होत्या. यावेळी दादांच्या कार्याचा आढावा घेताना तटकरे भावूक झाल्या. जसे आपण आषाढी एकादशीला वारीला जातो, तसे कोणत्याही लोकप्रतिनिधीसाठी बारामती ही विकासाची पंढरी आहे. या मतदारसंघात दादांनी अनेक स्वप्ने पाहिली आणि ती पूर्ण केली, असे त्या म्हणाल्या.


निवडणूक काळातील आठवणी सांगताना त्यांनी नमूद केले की, अजित पवार हे नेहमी मारुतीरायाचे दर्शन घेऊनच प्रचाराची सुरुवात करत. अर्ज दाखल करण्यापासून ते समारोप सभेपर्यंत बारामतीतच त्यांचा उत्साह कायम असायचा.

दादांनंतर सुनेत्रा पवार यांनी सर्व काही बाजूला ठेवून उभे राहणे, हे बारामतीकर कधीही विसरणार नाहीत. आम्हा सर्व कार्यकर्त्यांची इच्छा होती की, दादांना मुख्यमंत्री म्हणून पाहावे; मात्र तसे होऊ शकले नाही, ही खंत आहे, असे सांगताना तटकरे यांचा कंठ दाटला.त्या पुढे म्हणाल्या, दादा सहा वेळा उपमुख्यमंत्री झाले. भविष्यात सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून त्यांचे मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास आहे. सभेत मंत्री छगन भुजबळ यांनीही या भूमिकेला पाठिंबा दर्शविला. तसेच, येणाऱ्या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांना बारामतीकर प्रचंड मताधिक्याने विजयी करतील, असा विश्वास तटकरे यांनी व्यक्त केला.

# पुण्यात भोंदूबाबाकडून महिलेवर अत्याचार; ५० लाखांची लूट

पुणे । प्रतिनिधी

अंगात दैवी शक्ती आहे, अशी बतावणी करीत एका भोंदूने विवाहित महिलेवर वारंवार लैंगिक अत्याचार करून तिच्याकडून तब्बल ५० लाखांहून अधिक रक्कम उकळल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.



याप्रकरणी स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, आरोपी औदुंबर मनोहर गडदे (रा. पंढरपूर, जि. सोलापूर) याचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. पीडित ४२ वर्षीय महिला कौटुंबिक वादामुळे पतीपासून वेगळी राहात होती. याच परिस्थितीचा गैरफायदा घेत गडदेने स्वतःला देवऋषी असल्याचे सांगत तिचा विश्वास संपादन केला. तुमच्या अडचणी दूर करतो, जीवन सुरळीत करतो, अशी गोड बोलणी करीत त्याने महिलेला जाळ्यात ओढले. यानंतर स्वारगेट परिसरातील लॉजवर बोलावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

एवढ्यावरच न थांबता माणगाव येथेही तिला नेऊन पुन्हा अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. नोकरी लावतो, बांधकाम व्यवसायात मोठा फायदा करून देतो, या आमिषाखाली आरोपीने महिलेकडून वेळोवेळी ५० लाख ५५ हजार रुपये उकळले. काही रक्कम रोख, तर काही दागिन्यांच्या स्वरूपात घेतल्याचे समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे हा प्रकार तब्बल पाच ते सहा वर्षे सुरू होता.

# बारामतीमधून माघार, पण आमचा कुणालाही पाठिंबा नाही; काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांची भूमिका, भाजपवर टीका

पुणे : काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजप आणि निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल करत राज्यातील राजकारण पुन्हा तापवले आहे. बारामती निवडणूक, संघटन सृजन अभियान आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेसह विविध मुद्द्यांवर त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली.



हर्षवर्धन सपकाळ यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत म्हटलं की, निवडणूक आयोग हा एखाद्या राजकीय पक्षाप्रमाणे वागत आहे. महाराष्ट्र आणि बंगालमध्ये आयोगाचे कामकाज पाहता 'मत चोरी'चा मुद्दा आम्ही पुन्हा एकदा एसआयआर च्या माध्यमातून मांडणार आहोत. बारामती पोटनिवडणुकीबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केलं की, काँग्रेसने निवडणुकीतून माघार घेतली असली तरी कोणत्याही पक्षाला पाठिंबा दिलेला नाही. तसेच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला असून, तो पक्ष स्वतःला काँग्रेसशी जोडत असल्याचा दावा त्यांनी फेटाळला. काँग्रेस पक्ष राज्यात मोठे संघटनात्मक बदल करत असून 'संघटन सृजन' अभियानांतर्गत सुमारे ७,५०० नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती सपकाळ यांनी दिली. यामध्ये बहुतांश नवीन चेहऱ्यांना संधी दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उमेदवारांना प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.सपकाळ यांनी वारकरी संप्रदायाच्या मुद्द्यावर भाष्य करत म्हटले की, वारकरी परंपरा ही पुरोगामी विचारांची आहे आणि मनुवादाच्या विरोधात उभी आहे. मात्र, सध्या काही जण या परंपरेच्या आडून प्रतिगामी विचार मांडत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेवर टीका करत ती स्त्री-पुरुष असमानता आणि जातिवाद मानणारी असल्याचंही त्यांनी म्हटलं.

# जिहादींचे आक्रमण रोखा : नीतेश राणे

पुणे । प्रतिनिधी

आजूबाजूला वाढणारे जिहादी आक्रमण कमी करण्यासाठी हे हिंदू संमेलन आहे. जिथे जिथे हे संमेलन होत आहे, त्या ठिकाणी हिंदू एकत्र येत आहेत. हिंदू म्हणून आपण येथे बसलोय. गाय, देवीदेवतांकडे जर कोणी वाकड्या नजरेने बघत असेल, तर याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, असा इशारा मत्स्योद्योग आणि बंदरे विकासमंत्री नीतेश राणे यांनी दिला.



सकल हिंदू समाज लक्ष्मीनगर-पर्वती यांच्या वतीने शनिवारी विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी राणे बोलत होते. ते म्हणाले, उशिरा आल्यामुळे सर्वप्रथम दिलगिरी व्यक्त करतो. तुम्ही तुमचे ईद, मोहरम, बाशी ईद सण साजरे करू शकता; मग आम्ही आमचे सण का साजरे करू शकत नाही? हे हिंदुराष्ट्र आहे, सर्वांत आधी हिंदूंचे हित पाहिले जाते. मी चारवेळा आमदार झालो. ते हिंदूंच्या मतांवरच. सारसबागेतील शहरातील काही लोक बीफ आणून खातात, ही बाब गंभीर असून, सिद्धिविनायक गणपतीसमोर हे कृत्य खपवून घेतले जाणार नाही. तसेच, अशोक खरात हिंदू आहेत; मात्र, चूक ती चूकच, असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी त्यांच्यावर कडक कारवाई केली की नाही. पुण्यात कोणत्याही कॉर्पोरेट कंपनीत माझ्या हिंदू बहिणीकडे वाकड्या नजरेने बघितले तर खपवून घेतले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

# मुळा-मुठा स्वच्छतेसाठी स्वतंत्र प्राधिकरण; पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांची घोषणा

पुणे । प्रतिनिधी

शहरातील मुळा-मुठा नदीच्या स्वच्छता आणि पुनरुज्जीवनाच्या कामांना गती देताना पर्यावरणीय निकषांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी केले. वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर नदीसंवर्धनासाठी स्वतंत्र 'नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याचा निर्णयही त्यांनी जाहीर केला.



केंद्र सरकारच्या सहकार्याने पुण्यात मुळा-मुठा नदी सुधार योजनेअंतर्गत विविध कामे सुरू असून, त्यांचा आढावा घेण्यासाठी शनिवारी महापालिकेत बैठक आयोजित केली होती. या बैठकीत मुंडे यांनी प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या.

बैठकीस महापौर मंजूषा नागपुरे, स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, प्रजित नायर, विधी समितीच्या अध्यक्षा स्वरदा बापट यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मुंडे यांनी सांगितले की, अनेक उद्योगांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारले गेले असले, तरी त्यांची नियमित देखभाल होत नसल्याने अनेक प्रकल्प बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे शहरातील सर्व एसटीपी प्रकल्प पूर्णक्षमतेने कार्यरत राहतील, यासाठी महापालिकेने विशेष लक्ष द्यावे.

बैठकीदरम्यान आयुक्त नवल किशोर राम यांनी शहरातील सांडपाणीनिर्मिती, प्रक्रियाक्षमता, प्रकल्पांची अंमलबजावणी आदीबाबतचे सादरीकरण केले. वारजे, वडगाव, मुंढवा, मत्स्यबीज केंद्र हडपसर, खराडी, धानोरी, बाणेर आणि तानाजीवाडी-भैरोबा येथील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांची सविस्तर माहिती त्यांनी दिली.

# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी भवानी पेठ मुक्कामाबाबतचा निर्णय लांबणीवर

आळंदी : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पायी वारी पालखी सोहळ्याचा पुणे येथील भवानी पेठ मंदिर मुक्कामाबाबतचा निर्णय लांबणीवर पडला असून मुक्काम इतरत्र हलविणे वा सध्याच्या जागेतील उपाय योजनांबाबत ठोस अधिकृत हमी देणारा प्रस्ताव कोणाकडून आला नसल्याचे सांगत आळंदी देवस्थानने याबाबतचा निर्णय पुढे ढकलला आहे.येत्या १ मे रोजी यावर अधिकृत निर्णय घेऊ असे देवस्थानने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून म्हंटले आहे.



देवस्थानने भवानी पेठ मुक्काम ठिकाणी सोयी,सुविधांबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी,भवानी पेठ पालखी विठ्ठल मंदिर विश्वस्त यांच्याशी बैठक पार पडली त्यात योग्य त्या उपाय योजना देवस्थान तर्फे सुचविण्यात आल्या आहेत.

मात्र १२ एप्रिल पर्यंत मुक्कामाबाबत कोणताही ठोस अधिकृत हमी देणारा प्रस्ताव कोणाकडूनही आलेला नाही. त्यामळे संस्थान कमिटीला पालखी सोहळा समाजाला कोणतीही खात्री तुर्तास देता येणार नाही.

प्रशासन, लोकप्रतिनिधी, भवानीपेठ पालखी विठ्ठल मंदिर विश्वस्त, दिंडी संघटना पदाधिकारी, श्रीगरू हैबतरावबाबा यांचे वंशज प्रतिनिधी,श्रीमंत उर्जितसिंह शितोळेसरकार मानकरी,सेवेकरी व संस्थान विश्वस्त यांची संयुक्त बैठक प्रशासनाच्यावतीने पूढील ८ दिवसांत आयोजित करण्यात येणार आहे. सदर बैठकीत चर्चेअंती सूविधा व उपाययोजनाबाबत अधिकृत प्रस्ताव प्राप्त झालेनंतर पालखी सोहळा दिंडी समाजाच्यापूढे हा प्रस्ताव २६ एप्रिल रोजी पंढरपूर मुक्कामी चर्चेला ठेवण्यात येईल.तदनंतर दि.१ मे रोजी आळंदी येथे आषाढीवारीची कार्यक्रम पत्रिका जाहीर करण्यात येईल अशी माहिती सोहळा प्रमुख ड.राजेंद्र उमाप,प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे,विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे कबीर बुवा,विश्वस्त योगी निरंजननाथ,विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील,विश्वस्त ड.रोहिणी पवार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.